# कापूर

श्रद्धा पाटील-व्यास

# कापूर

श्रद्धा पाटील-व्यास

गुरुसखा प्रकाशन

# कापूर

© **श्रद्धा पाटील-व्यास**
ग्रीन वुडस्, बी-५०३, एम. व्ही. रोड ,
चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई -९३
shraddhavyas8@yahoo.com

■ प्रकाशक :
**गुरुसखा प्रकाशन**
१०, सई गार्डन, पर्वती गाव, पुणे ४११००९.
फोन - ०२० - २४४२०५३०,
**e-mail:** gurusakhaa.prakashan@gmail.com

■ मुद्रक :
एस. एम. प्रिंटर्स
नांदेड फाटा, पुणे

■ मुखपृष्ठ व आतील चित्रे :
**रोहित कोकीळ**

■ मुद्रित शोधन
**प्रदीप कुलकर्णी**

■ प्रथमावृत्ती :
**अक्षय्य तृतीया, १३ मे २०१३** : १००० प्रती

■ मूल्य :
₹८०/-

कर्पूरत्वें कापुरीं। सौरभ्य असे जयापरी।
शरीर होऊनि शरीरीं। कर्म जेवीं।।
– ज्ञानेश्वरी

नवल वर्तले, नवल वर्तले, नवल गुरुचे पायी।
कापूर जळूनि गेला, तेथे काजळी उरली नाही।।
– संत जनाबाई

**जिने जगण्याचं बळ दिलं, त्या माझ्या प्रिय आईस...**

# कवाड उघडताना...

माझं पुस्तक प्रकाशित होतंय, हे मला अजूनही खरं वाटत नाहीये. छत्तीस वर्षं ज्या कविता मी मोजक्याच लोकांना दाखवल्या, त्या आता जगासमोर येणार आहेत. माझ्या कवितांना काय वाटत असेल, हाच विचार मनात ठाण मांडून बसलाय. 'मोकळ्या झालो आम्ही' की, 'का आणलं बरं हिनं आम्हाला सर्वांसमोर?'

उशीर झालाय; पण खूप उशीर झाला नाहीये, नाही का? बारावीत असताना एका मैत्रिणीला चिडवायला म्हणून पहिली कविता लिहिली आणि ती जन्माची सोबतीण झाली! मध्येच सोडून गेली, असं वाटता वाटता पुन्हा ती माझ्यातच सापडते. गंमत म्हणून कविता केल्या आणि त्या रूपारेल कॉलेजच्या 'साहित्य पाठवा'च्या डब्यात टाकल्या. **'हरवलेले नशीब'** छापून आली आणि मी तर घाबरलेच, की पपा काय म्हणतील? नशीब हरवलं?, वाटलं खूप प्रश्न विचारतील आणि रागावतील म्हणून मग घरी कविता कधी दाखवल्याच नाहीत. नंतर आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत **'प्रतिबिंब'**ला पहिलं बक्षीस मिळालं, आकाशवाणीवर कार्यक्रम झाला आणि त्यांना कळलंच; पण ते रागावले नाहीत. खरंच, कवितेमुळं जगणं सुसह्य झालं. हीच वेळ आहे जेव्हा मी सर्व जगासमोर तिचे आभार मानू शकते.

१९७६मध्ये मी पहिली कविता लिहिली. तेव्हा मी १५ वर्षांची होते. त्या वयातल्या कविता किती चांगल्या, किती वाईट हे न ठरवता मी त्यांच्याकडं तटस्थपणे पाहते. त्याच साक्षीभावानं आता उमटलेल्या कवितांकडंही बघते आणि माझ्याच ओळी मला उत्तर देतात - **'मुडकर देखूँ तो सब अजनबीसा, लोग बदले या मैं बदल गयी हूँ, क्या थी मैं क्या बन गयी हूँ!'**

ज्या कवितांना तारखा होत्या, त्या तशाच ठेवल्या आहेत. त्यामुळं मनाचा प्रवास कळायला सोपा झालाय. बऱ्याच कविता परमेश्वराला उद्देशून लिहिल्या, कारण माझं खरं भांडण देवाशीच होतं. 'होतंच' म्हटलं पाहिजे; कारण आता भांडण्यासाठी वेगळेपण

उरलं नाहीये. आधी 'असं का?' 'तसं का?' असे प्रश्न पडायचे, पण आता पूर्ण शरणागती मानल्यामुळे भांडण्याचं कारणच उरलं नाहीये.

१९८५मध्ये विवेकानंद केंद्रात गेल्यावर कवितेचं बाड बाजूला पडलं आणि **'कोयल'**ची भाषाही बदलली. **'अब एक नया मकान बन रहा है, जिस में दुखों को कोई जगह नहीं।'** हे शब्दही खोटे ठरावेत, इतकं प्रचंड दुःख लग्नानंतर मिळालं. इतकं की दुःखांनीही डोळे झाकले आणि शब्द बोथट होऊन गेले. जणू काही 'असं होणार' ह्याची अंतर्मनाला जाणीव झाली होती आणि मग **'कोयल, तू चुप थी, अच्छा था, चुप ही रह जा, तो और अच्छा'** ह्या ओळी उमटल्या होत्या.

**'तेरी नन्ही को गीत ना सुना, राजा-रानी की कहानी तो, लाडली को कभी ना कह, उसे तो कहीं और पलना है...'** हे लिहिताना **'सलोनी'** आणि **'बकुळफुला'** लिहिली गेली. मला मुलीची प्रचंड हौस आणि ओढ. ती जीवनात कधीच येणार नाही, हे कळून, त्यातून सावरून आणि मग त्या पोकळीतून बाहेर पडून प्रत्येक मुलीत स्वतःची छकुली शोधत राहिले. हे करता करता स्वामीजींनी सांगितलेला एकात्मभाव आपोआपच आत्मसात होत गेला आणि पुढच्या 'मरण बरं' अशा स्थितीतही जीवनाला जगण्याची उमेद मिळाली.

कविता वाचून तुमच्या मनात अनेक प्रश्न नक्कीच उठतील, ज्यांची उत्तरं मी दिली तर एक आत्मचरित्र छापावं लागेल; आताशा मीच माझ्या शब्दांचा खूप आनंद घेतेय आणि सहज शब्द उमटतात : **'शब्दांनो तुम्ही येता कसे आणि कुठून, मी आश्चर्याने पाहत राहते, पाहता पाहता तुमचा खेळ, माझी मीच मोहून जाते'.**

जून २०१२ मध्ये 'अरुणाचल'हून आले आणि शब्द जणू लोहित नदीसारखे सहस्रधारांनी स्रवू लागले. मी लिहीत असले, बोलत असले किंवा काहीही करत असले, की एक श्रद्धा आतून आणि एक श्रद्धा बाजूला उभी राहून अलिप्तपणे बघत असते. आतली श्रद्धा चांगलं-वाईट याचा निवाडा करते; पण ही दुसरी श्रद्धा मात्र नुसतं साक्षीभावानं त्रयस्थासारखी पाहते. पण आता कविता लिहिताना मी ज्या तिसऱ्या श्रद्धाविषयी बोलते आहे, तीसुद्धा

बाजूला उभी राहून माझ्या शब्दांकडं आश्चर्याने बघू लागली आहे. रात्री, दिवसा केव्हाही शब्द यायचे आणि मी पटापट मोबाइलमध्ये लिहू लागायची. माझंच मला जाणवतं, की एक शब्द इकडचा तिकडं होत नाही आता. केंद्रातली शिकवण- खाडाखोड न करता लिहायचं - जी कवितेसंदर्भातही प्रत्यक्षात आली.

**'नीतळ नीर नद्या आणि नील निळे डोंगर'** किंवा **'तरीही वाट वाट पाहते'** असे शब्द कुठून येतात बरं? काही ओळींच्या तर मीच प्रेमात पडलेय - **'कुठे शोधू स्पर्श तुझे, शोधून मग बांधू कशात? कुठे तुझे श्वास हरवले, अडकले का माझ्या श्वासात?'** सुधीरची आठवण व्याकुळ करते आणि शब्द सुचतात, असं काही नाही. दुःखाचे आघात आणि सोबतीला संवेदनशील मन असलं, की शब्दांना वाट मिळतेच.

शब्दांचीपण गंमत आहे! कुठल्या भाषेत सुचतील काही माहीत नसतं. भावनांना भाषेचं बंधन असायला हवं का? इंग्रजी, हिंदी आणि कोण जाणे पुढं गुजराथी आणि बंगालीतही शब्द स्फुरतील! 'कापूर'मध्ये सगळ्या कविता जशा आहेत तशा घ्यायच्या, कुणालाही नाकारायचं नाही, असं ठरवलं; पण काही कविता जागेअभावी वगळाव्या लागल्या. **'झाले कापूर की वात तेवती माहीत नाही'** ही ओळ लिहिली आणि 'कापूर' हे शीर्षक सतत जळत राहिलेल्या आयुष्यासाठी अगदी समर्पक वाटलं.

कवितासंग्रह काढायचा हे काही महिन्यांपूर्वी ठरलं. 'फेसबुक'वर कविता पोस्ट करायला लागले आणि सगळे जण 'पुस्तक छाप' म्हणून मागं लागले. माझे आत्मज आहेत म्हणून हे शक्य होतंय; अन्यथा वाट बिकट होती. कोण काय म्हणेल, लोक काय म्हणतील, ह्या सर्व बंधनातून मुक्त झाल्यावरच मी 'हो' म्हणू शकले. आता आपलं आणि परकं हा भेदच नष्ट झालाय; त्यामुळं कोण काय म्हणेल, हे प्रश्न संपून गेलेत.

खूप खूप आधीपासून मला समुद्र आणि आकाशाचं वेड आहे जे 'प्रतिबिंब' आणि इतर अनेक कवितांमध्ये उठून दिसतं. **'हे आकाश ओ सागर मेरे, तुमही तो मेरे मीत हो'** किंवा **'ओ ओशन'** आणि बहुतेक सर्वच कवितांमधून ते उठून दिसतं. शिवाय मला

मृत्यूचंदेखील प्रचंड आकर्षण होतं आणि अजूनही आहे! त्याला बोलावताना, कधी तो सोबतीला येऊन राहिला, ते कळलंच नाही. लग्नाआधीपासूनच मला त्याची चाहूल लागली आणि नंतर तर तो घरात ठाण मांडूनच बसला. सतत सहवासानं तर 'मृत्यू'ही 'मृत्युसखा' होऊन गेला. हा सखा कवितेत अचानकच डोकावला, तोही विविध रूपांत. **'सखा असतो कधी कृष्ण, कधी सखा होतो गुरू'** आणि मला तर त्याचं रूपदेखील ठाऊक नाही. असं वाटत असतानाच गुरू आणि सखा एकत्र सापडले आणि स्वामीजींना मी नाव दिलं **'गुरुसखा'!**

**'पाठव तुझे स्पर्श काळोख पांघरताना, जिवंतपणी मृत्यूचा श्वास ऐकताना'** खरोखरच मी मृत्यूचा स्पर्श आणि त्याचे श्वास दोन्ही अनुभवलं. तो एक वेगळाच विषय आहे; पण मला जे सोसावं लागलं त्याची आता खंत राहिली नाही. मला माहीत आहे की मी 'कुंतीच' आणि उन्हात 'गुलमोहर' होऊन बहरण्याचं दान स्वतः मागून घेतलंय. मी नेहमी गमतीत म्हणते, की स्वामीजींनी माझं घर उन्हात बांधलय; पण तीही कृपाच समजते मी! माझ्यासाठी मी दुःखच मागितलं त्या न दिसणाऱ्या देवाकडं आणि त्यानं दिलंही भरभरून. त्यानं दुःखातही विविधता दिल्यामुळेच मी प्रत्येकाचं दुःख समजून घेऊ शकले, ह्याचाच मला आता आनंद होतो.

**'सगळ्या तपांच्याच गोष्टी...'** पुढचं 'तप' काय घेऊन येतंय, ह्याची आता उत्सुकता आहे. काहीही येवो; पण ते सहन करण्याची शक्तीही मिळो, एवढीच इच्छा माझ्या 'गुरुसखा'चरणी...

- श्रद्धा

# आत्मबंध ...

पुण्यात विवेकानंद केंद्रात १९९० ते १९९५ या काळात मी पूर्णवेळ काम केलं. या काळात अनेक सहकारी लाभले. केंद्रातून बाहेर पडल्यावरसुद्धा काळ, ठिकाण, वय, हुद्दा याच्या पलीकडे जाऊन आमचं हे नातं अतुट राहिलं आहे. आम्हा सर्वांना जोडणारा एकमेव धागा म्हणजे स्वामी विवेकानंद!. या सर्व नात्यांपलीकडच्या सुहृदांना मी आत्मज म्हणते. माझ्या आत्मजांनी 'कापूर'चा सर्व भार उचलला. त्यांचे आभार मानणं उचित नाही. तरीही ज्यांच्यशिवाय 'कापूर' अपुरं आहे, त्यांच्या कायम ऋणात राहणं मला आवडेल.

तिमीराकडून प्रकाशाकडे वाटचाल करताना जयश्री-उदय मांडके, ऋचा-योगेश झोपे, प्रवीण पायगुडे आणि शिवांगी, जिगिषा व चिन्मयी, यांची साथ महत्त्वाची होती. सुरेंद्र पाटसकरमुळेच तर 'कापूर' शक्य झालं. प्रत्येक कविता टाईप करणे, प्रूफ रिडिंगपासून पुस्तक छपाईपर्यंत त्यानं न कंटाळता केलं. रोहित कोकीळ कधी आत्मज झाला कळलंच नाही. प्रत्येक कविता अनेकवेळा वाचून रेखाचित्र काढणं आणि ज्वाळेपासून जीवनापर्यंतचा माझा प्रवास मुखपृष्ठातून दाखवणं हे आत्मजच करू जाणे. छपाईची जबाबदारी सुरेंद्र आणि सुनील हुलेनी सांभाळली. महेश बर्दापूरकर, सचिन व अर्चना सोनिग्रा, दिनेश वाडेकर, रूपा, कृष्णा, गीता, व सुवर्णा ही सगळी माझ्या आत्म्याचीच रुपं. शीतल मोहिते, झुमा तिवडे, संगीता गायकवाड, ॲंग्रेलो कुटीन्हो हे कार्यालयीन सहकारी, कविता छाप असे हक्काने सांगणारे शालेय वर्गमित्र विजय गांगल, चंद्रशेखर खापरे ह्यांनी मनोबल वाढवलं, पूजा  खापरेचेही विशेष आभार.

अनेक वर्ष माझ्या कवितांचं बाड सांभाळणारी मंजू शहा, छाया सावंत आणि स्वाती कुलकर्णी या बंगाली वर्गातील मैत्रिणींनीही अपरंपार प्रेम दिलं. डॉ. किशोर महाबळ यांनी शेवटच्या टप्प्यात कविता वाचून मोलाचा सल्ला दिला. केंद्राच्या कामानिमित्त भारतभर फिरताना अनेकांनी वेळोवेळी कविता वाचून प्रोत्साहन दिलं त्यांचेही विशेष आभार.

छोटा असून ज्याने मोठा होऊन आधार दिला, त्या राहुलचे आणि सानिकाचे मन:पूर्वक आभार ...

कविता संग्रहासाठी प्रकाशक शोधण्याचा विचार सुरू झाला आणि आपणच प्रकाशक व्हावं ही कल्पना पुढे आली. त्यातूनच 'गुरूसखा प्रकाशना'ची निर्मिती झाली. हे आमचं पहिलंच पुस्तक. आमच्या प्रयत्नाला सर्वांची भरभरून दाद मिळेल असा विश्वास आहे.

- श्रद्धा

# अनुक्रमणिका


१. गुरुसखा ................................ ११
२. गुलमोहर ................................ १२
३. आयुष्याचे गणित ..................... १३
४. अंधार माझा सोबती .................. १४
५. हरवलेले नशीब ........................ १५
६. उकल ................................... १६
७. ओढ ...................................... १७
८. निर्माल्य ................................. १८
९. सुरावट ................................. १९
१०. साद ...................................... २०
११. बिरहन .................................. २१
१२. आवारा ................................. २२
१३. मुलाकात ............................... २३
१४. पुकार .................................... २४
१५. फरेबी .................................... २५
१६. अस्तित्व ................................ २६
१७. शिकार .................................. २७
१८. एकटी .................................... २८
१९. मनोगत .................................. २९
२०. देवास .................................... ३०
२१. आभाळाचे डोळे ...................... ३१
२२. आयुष्य ................................. ३२
२३. कैफियत ................................ ३३
२४. बेवफाई ................................. ३४
२५. भरारी .................................... ३५
२६. मी न एकटा ............................ ३६
२७. माती ..................................... ३७
२८. तपश्चर्या ................................. ३८
२९. भंगलेली शलाका ..................... ३९
३०. क्षितिजापलीकडे ...................... ४०
३१. अनामिका .............................. ४१
३२. पंखा ..................................... ४२
३३. नागीण .................................. ४३
३४. रिता प्याला ............................ ४४
३५. चोट ...................................... ४५
३६. जुदाई .................................... ४६
३७. प्यासी आत्मा .......................... ४७
३८. पाऊलखुणा ............................ ४८
३९. खडक .................................... ४९
४०. सहेली ................................... ५०
४१. राज ...................................... ५१
४२. इंद्रधनूसम भेटींची .................... ५२
४३. टूटता तारा ............................. ५३
४४. खोज अपनेपन की .................. ५४
४५. पाठशिवणी ............................. ५५
४६. सिगरेट की व्यथा ..................... ५६
४७. चंदनस्पर्श .............................. ५७
४८. वेगळी ................................... ५८
४९. कविते ................................... ५९
५०. एहसास ................................. ६०
५१. शरीर .................................... ६१
५२. रेषा ...................................... ६२
५३. प्रतिबिंब ................................. ६३
५४. मुलाकात ............................... ६४
५५. तलाश ................................... ६५
५६. जूता ..................................... ६६
५७. स्वप्न .................................... ६७
५८. कबुली ................................... ६८
५९. अंदाज ................................... ६९
६०. ठेस ....................................... ७०
६१. डाकिये .................................. ७१
६२. असर ..................................... ७२
६३. माध्यान्ह ................................ ७३
६४. आभास .................................. ७४
६५. का? ...................................... ७५
६६. पाऊलखुणा ............................ ७६
६७. साया ..................................... ७७
६८. कफन .................................... ७८
६९. कोयल ................................... ७९
७०. होरपळ .................................. ८०
७१. तुम मेरे न रहे ......................... ८१
७२. बकुळीचे गीत .......................... ८२
७३. सागर अन् आकाश .................. ८३
७४. कुंती का दान .......................... ८४

७५. अद्वैत ..... ८५
७६. कडा ..... ८६
७७. प्राक्तन ..... ८७
७८. अनमोल मोती ..... ८८
७९. तुम कौन हो? ..... ८९
८०. इकरार ..... ९०
८१. झोका ..... ९१
८२. कहाणी ..... ९२
८३. खुदगर्जी ..... ९३
८४. रूठे नसीब ..... ९४
८५. फरयाद ..... ९५
८६. गुमराह ..... ९६
८७. जन्नत ..... ९७
८८. घाव ..... ९८
८९. दगा ..... ९९
९०. **मेरे आत्मज** ..... १००
९१. गझल ..... १०१
९२. अनकहे फसाने ..... १०२
९३. बसर ..... १०३
९४. तू हो जा खफा ..... १०४
९५. अधूरी दास्ताँ ..... १०५
९६. गुजरती उम्र ..... १०६
९७. शुक्रतारा ..... १०७
९८. आत्मपरीक्षण ..... १०८
९९. आहट ..... १०९
१००. मनाली में ..... ११०
१०१. साज़े सितार ..... १११
१०२. माँ का आंचल ..... ११२
१०३. सराया ..... ११३
१०४. मैली चादर ..... ११४
१०५. ओ सागर ..... ११५
१०६. भगवन् ..... ११६
१०७. अनुभूती ..... ११७
१०८. तुळशीमाळ ..... ११८
१०९. गुमनाम ..... ११९
११०. स्मृती ..... १२०
१११. हे ईश्वर ..... १२१
११२. नया मोड ..... १२२
११३. स्पर्श ..... १२३
११४. धैर्य ..... १२४
११५. खोया चाँद ..... १२५
११६. मेहेरबानी ..... १२६
११७. कोयल ..... १२७
११८. बकुळफुला ..... १२८
११९. मृत्यूस ..... १२९
१२०. सलोनी ..... १३०
१२१. लहरी ..... १३१
१२२. O Darkness ..... १३२
१२३. गल्लत ..... १३३
१२४. धावा ..... १३४
१२५. याद ..... १३५
१२६. समुद्रपक्षी ..... १३६
१२७. साधना ..... १३७
१२८. नातं ..... १३८
१२९. जा निघून ..... १३९
१३०. अस्तित्व ..... १४०
१३१. मृत्युसखा ..... १४१
१३२. अबोल दुःख ..... १४२
१३३. आत्मज्योत ..... १४३
१३४. तुझी सय येते ..... १४४
१३५. उःशाप ..... १४५
१३६. अरुणाचलास ..... १४६
१३७. O Ocean ..... १४७
१३८. अश्वत्थामा ..... १४८
१३९. ऐ मेरे शब्दों ..... १४९
१४०. मन पाखरू झाले ..... १५०
१४१. सखा ..... १५१
१४२. Magician ..... १५२
१४३. मेरी हवेली ..... १५३
१४४. अस्पर्शित स्पर्श ..... १५४
१४५. Tryst with Death ..... १५५
१४६. मृत्युसखा ..... १५६
१४७. अन्जान अजनबी ..... १५७
१४८. You Needn't Know ..... १५८
१४९. Unseen Mystic ..... १५९
१५०. जावळ ..... १६०
१५१. सौभाग्यवती ..... १६१
१५२. जगदंबे ..... १६२

# गुरुसखा

माझं माझं असं नाही काहीच
सगळं काही तुमचं, दिलं तुम्हीच

हात धरून घेऊन गेलात
ह्या तीरावरून त्या तीरी
सोडून चमचमणारी मुंबई
नेलंत मला कन्याकुमारी

सगळ्या 'तपां'च्याच गोष्टी
एक तप अरुणाचल ते पुण्यनगरी
पुढचं तप 'काळ्या' मण्यांच्या गुंफी
पुनःश्च मग अमरावती ते मुंबापुरी

दुःख ही तुम्हीच दिलंत स्वामीजी
अन् तारूनही नेलंत ह्या संसारसागरी
ढासळले जरी पुनःपुन्हा मी अंतर्बाह्य
तुम्हीच की हो पुन्हा बांधली उभारी


'गुरुसखा' आता साथ सोडू नका
तुमच्यावाचून उभं जीवन अंधारी
कुंतीचं दान मागितलं मी एकदा
डोळे उघडे असून का झाले गांधारी

जीवन संपू दे फक्त तुमच्या चरणी
नको लाभोत मला सुखं ऐश्वर्यं सारी
एवढचं मागणं आता शिवाच्या अंशा
तुमचं नाव, तुमचं रूप सदा राहो अंतरी

२८-६-२०१२



# गुलमोहर



अब के आंगन पहली बार
खिला मेरा गुलमोहर
ऐसे लाल फूल सुनहरे
जैसे सुलगते-जलते अंगारे
कैसा चमत्कार भगवान
कडी धूप मे मीठी मुस्कान
देख के उस को लगा यूँ
अगर जीवन में धूप बरसे
दुख से जो तनमन जले
निखर उठना तू भी यूँ
इसी गुलमोहर की तरह

अब के फिर पहली बार
रात की रानी भी महकी
मेरे अमुवा में छिप के
अब के कोयल भी चहकी
चारों ओर नजारे अनोखे
देख देख दिल क्यूँ न बहके?
पर-
जब सूरज की छुई किरन
रातरानी ने ढांका बदन
जैसे किसी की नजर पडी
रही कोयल चुप से खडी
पर गुलमोहर वहीं रहा
कडी धूप को हँस के सहा
भगवान, तुम से यही प्रार्थना
इतनी मांग पूरी करना
बरसे जब दुख की आँधी
तडपाए जब भी धूप कडी
उसका दीदार बनाए रखना
मुझे गुलमोहर बनाए रखना!
मुझे गुलमोहर बनाए रखना!!

१०-०५-९१


# आयुष्याचे गणित

सुख अधिक सुख करताना
शून्य फक्त उरले
दुःख अधिक दुःख मोजताना
हात मात्र थकले

त्या शून्याच्या पोकळीत
मी गेले हरवून
दुःखांची बेरीज करताना
मला गेले विसरून

हरवलेले बालपण माझे
सारखी आहे आठवते
ऐन अशा तारुण्यात
मी लहानपण शोधते

मला माझ्या आयुष्यात
सुख कधी मिळेल का?
वैराण अशा जीवनात
प्राजक्त कधी फुलेल का?



२२-७-७७

# अंधार माझा सोबती

अंधार! अंधार! !
चोहीकडे अंधारच आहे; पण
दूर एक दिवा तेवताना दिसला
मी त्या दिशेने चालू लागले
वाट चुकली, चुकतच गेली
कारण...
तो एक काजवा होता

अंधारातून सूर्य उगवेल, प्रकाश येईल
या आशेने मी चालतच राहिले
चुकली वाट चुकतच गेली
पण माझ्या वाटेवर
सूर्य उगवलाच नाही
कारण...
बाजूचा अंधार अधिक उग्र होता

त्या अंधारात चालताना
मी प्रकाश विसरले
वाईटच फक्त दिसल्यामुळे
मी चांगल्याला विसरले
माझ्या आयुष्याची नौका
भरकटत गेली
कारण...
समुद्र जास्तच खवळला होता.

आता उजेड माझा वैरी
आणि दिवस माझा शत्रू आहे
कारण...
केवळ रात्र माझी सखी
आणि अंधार माझा  सोबती आहे ...!

# हरवलेले नशीब

कोणे एके काळी नवल असे घडले
म्हणे एका मुलीचे नशीबच हरवले

मुलगी आणि नशीब दोघेही थकली
आंधळी कोशिंबीर छानच रंगली

खेळ असा खेळताना राज्य आले मुलीवर
पण लपलेले नशीब काही दिसले नाही त्यानंतर

शेवटी नशिबाच्या शोधात मुलगी निघाली घरून
पण अखेर त्याला शोधता शोधता ती गेली थकून

थकून त्या मुलीने 'काळझोप' घेतली
नशीब हसून म्हणाले, 'कशी मजा आली'!

२२-७-७७

# उकल

माझ्या मनाचे अजब कोडे
कुणीतरी उकलेल काय?
त्यावर चढलेली दुःखाची धुंदी
कुणीतरी उतरवेल काय?

दुःखाच्या त्या कैफामध्ये
मला न जगाचे उरले भान
मनाचे धागे उकलताना
कुणीकडचे नुरले ध्यान

ह्या मनाचे अवखळ वारू
नकळे त्या मी कसे आवरू
लगाम आहे सुटला त्याचा
चौफेर आहे बेफाम उधळला

२२-७-७७

# ओढ

मला असं वाटतं की
सागराच्या लाटेमध्ये
स्वतःला झोकून द्यावं
निष्ठूर अशा जगाला
स्वार्थी या दुनियेला
दृष्टीपासून दूर करावं
निळ्या अथांग जलाशयात
आणि निळ्या अवकाशात
मी मला विसरून जावं
बरं-वाईट, लहान-मोठं
पाप-पुण्य अन् खरं-खोटं
या भेदातून दूर सरावं

२२-७-७७

# निर्माल्य

एका कळीचे फुलण्याआधीच
झाले निर्माल्य

जीवनात तिच्या पुन्हा न कधीच
आले मांगल्य

हुंगल्यानंतर तिला न फुलण्याचे
उरले स्वारस्य

निर्माल्याने का देवाला वाहायचे
आपले सर्वस्व?

ओठावर तिच्या पुन्हा ना कधी
उमलले हास्य

जीवनाच्या पूर्णत्वाचे ना कधी
मिळाले साफल्य

नशिबी तिच्या होते केवळ
लिहिले दुर्भाग्य

कळीचे फूल बनण्याचे तिला न
लाभले सौभाग्य


२३-७-७७

# सुरावट

दूर वाजते आहे सतार
मनी उमटले झंकार
वाऱ्याने लहरत आले सूर
सतार वाजते आहे दूर

बोलू लागताच ती सतार
भारले गेले आहे आकाश
तार तिची छेडली जाताच
शब्दांना मग नसतो अवकाश

तिच्या सुरांच्या लहरींवर
सुख-दुःखं जातात विरून
आणि येता भान जगाचे
सतार वाजू लागते फिरून



*ऑगस्ट ७७*

# साद

रात्रीच्या या एकांतवेळी
कोणी मला साद घातली?
आकाशाच्या प्रांगणातली
नक्षत्रं मला खुणवीत होती

पहाटेच्या रम्य समयी
कोणी मला हाका मारल्या?
चंद्राच्या विरहिणी, त्या
भरतीच्या लाटा होत्या

सायंकाळच्या पिवळ्या रंगी
कुठूनतरी आवाज आला
जीवनाच्या अस्ताचा
सूर्य मला बोलवत होता


*ऑगस्ट ७७*

# बिरहन

वो तो चले गये मगर
याद पीछे रह गयी
जिन्दगी रुक गयी मगर
सांस चलती रह गयी

हम राह चलते मगर
मंझिल दूर रह गयी
तूफान तो थम गया मगर
कश्ती मेरी डूब गयी

नोव्हेंबर ७७



# आवारा

कोई तो हमे बताएँ के
हम आए कहां से और कौन है?
सुखों ने तो मुख मोड लिया
पर गमों का हमसे रिश्ता क्या है?

हम ढूँढ रहे थे गलियों गलियों
क्या कोई घर हमारा है?
हम पूछ रहे थे रास्तों से
क्या कोई मंझील और ठिकाना है?

हर कली ने हमसे यही कहा
आप है गमों का सहारा
हर फूल मुस्कुराकर बोला
मौत ही बस है ठिकाना आपका

*नोव्हेंबर ७७*

# मुलाकात

बडी मुद्दत के बाद
उनसे मुलाकात हुई
होंट तो चुप रहे मगर
आँखो ने दिल की बात कही

देख के उनको रास्ते में
दिल की धडकन बढ गयी
हम देखते ही रह गए
और मंझील वहीं रुक गयी

हमने यूँ बहाना किया
जैसे उनसे नफरत हो-
पर मन ही मन दुवा दी
बस सदा तुम खुश रहो।

१९-२-७८


# पुकार

देख ओ आसमाँवाले जरा
तेरी दुनिया मे इन्साफ नहीं
आज से नाम भी ना लेंगे तेरा
गर तू हमारी सुनता नहीं

इतने जमाने गुजर भी चुके
क्या तेरी ये नींद खुलती नहीं
हम दुखियों की पुकार सुन के
क्यूँ तेरे नैन छलकते नहीं?

हम तो मर जाएँगे घुटकर
पर हो सके तो उस के बाद भी
आएँगे तेरे दर पे अक्सर
सोचकर, तू हमारी सुनेगा कभी।

१२-३-७८



# फरेबी

जमाने भर की बातों को
ना दिल में तुम जगा देना
अगर मुमकिन हो सके तो
काश अपनेही लिए जीना

ये दुनिया तो बस है फरेबी
सच की यहाँ चलती नहीं
झूठ का दामन थाम ऐ दिल
वरना ये जिन्दगी तेरी नहीं

यहाँ सब लोग हैं पापी
दिल में छुपाए हुए जफ़ा
इनमें जिन्दगी गुजारकर
क्या तू निभाएगा वफ़ा।

१२-३-७८

# अस्तित्व

मन साशंक आहे तुझ्या अस्तित्वाविषयी
अन्यायवृक्ष हे फोफावले आहेत ठायी ठायी

हे वृक्ष गगनाला भिडले तरी तू पाहत नाहीस
यांची मुळं पृथ्वी गिळतात पण तू उठत नाहीस

लेकरांची काळजी वाहते वत्सल माउली
मग तू का नाही धरत आमच्यावर सावली?

आता तरी प्रकट हो तुझ्या सगुण रूपांत
म्हणजे निःशंक होतील सारे निर्गुण साक्षात

# शिकार

वाटलं नव्हतं काळ होईल माझा पारधी
आणि मीच असेन त्याच्या लक्ष्याची मृगधी

कळप सारा पळून गेला टाकून एकटीला
मी मात्र तिथेच राहिले घेऊन मन सोबतीला


जवळच होता शिकारी रोखून आपला भाला
चाहूल लागताच मी पळाले जीव जपायला

खड्डा नाही दिसला म्हणून मला ठेच लागली
आणि येऊन जवळ त्याने आपली शिकार साधली

# एकटी

समोर अथांग सागर होता
क्षितिज टेकलं होतं अथांगाला
सगळेच एकटे, एकाकी
अन् मीही एकटी, सर्वार्थाने
समुद्र हमसून रडत होता,
पाणी खारट होतचं होतं
सूर्य, सागर आणि मी
एकटेच होतो, म्हणून
मी पण रडत होते
एकलेपणाच्या जाणिवेने
अश्रू सुकताच माझ्या सोबत
जागोजाग उभे राहिले
मिठाचे डोंगर अन्...
ढासळणारे वाळूचे घर।

# मनोगत



जीवना, शक्य असल्यास
मला समजून घ्यायचा
करशील का रे प्रयत्न,
की असाच पदोपदी तू
न उमजून माझं मन
करशील माझा विश्वासघात?
तुला होईल पश्चात्ताप
मला साथ दिल्याचा
तेव्हा तरी मृत्यू देऊन
करशील ना कबूल तुझी चूक -
की असाच क्षणोक्षणी
जीवनाच्या वाटेवरती
न देऊन मला मृत्यू
करशील माझी विटंबना!

एप्रिल १९७८

# देवास

मी जी काही आहे
ती फक्त तुझ्याचमुळे
साऱ्या सुख-दुःखांचं श्रेय
माझं तुलाच आहे,
मी फक्त रात्रच राहू शकले
तर सारा दोष तुझाच,
आणि दिवसाला विसरले
तोही दोष तुझाचं
मी जर वाईट असेन
तर तू देखील तितकाच वाईट
आणि मी चांगली असेन
किंवा मी चांगली झाले
तरच मात्र तू चांगला असशील!
एरवी, मी जशी आहे,
तूही तसाच आहेस!

२९-४-७८



# आभाळाचे डोळे

आभाळाचे डोळे भरलेत गच्च
अश्रूंचे मेघ बरसले अविरत
तरीही का होत नाही आहे
मनाचं ओझं हलकं...?
ढगाळ जीवनाच्या आसमंतात
दुःखाच्या काळ्या मातीचा
अवीट सुगंध भरून राहिलाय
म्हणूनच, सुखाच्या फुलांचा
नाजूक गंध बावरतोय
आपलं अस्तित्व दाखवायला!

# आयुष्य

माझं आयुष्य उंबरासारखं,
जो फुलण्याचं विसरला
माझं जीवन कडूलिंबाचं,
ज्याने आपला मधू हरवला

माझं आयुष्य एक ज्वालामुखी,
जो सतत धुमसत राहिला
माझं जीवन सागरासारखं,
जो नेहमीच उसळत राहिला

माझं आयुष्य एक निखारा,
जो राहिला अखंड जळत
माझं जीवन चंदनाचं खोड,
जे राहिलं सदैव झिजत

# कैफियत

सुगंध ना गंध
रूप ना रंग
एक रानफूल
होऊन मलूल
पडले होते
एकाकी ते
पाच वाटसरू
जणू पंचमहाभूते
जात असता
सहज तोडले
चुरून फेकले
विसरून त्याला
चालते झाले
असेच जर होते
करायचे तर
निदान त्याला
फुलू तरी द्यायचे
फुलू तरी द्यायचे...

*एप्रिल १९७८*

# बेवफाई

दम घुटा जा रहा है
इन चार दीवारों में
सब हो गए हैं पराए
क्या रखा हैं दुनिया में

जीवन मे आते है सब
दूर जाने के लिए
कर जाते है ये वादे
भूल जाने के लिए

क्या याद करें उनको
जो प्यार का ढोंग रचाते
जो बातों बातों में
बेवफाई का सबूत देते



# भरारी

धरुनी त्या पिलाते आकाशी बघ घार हिंडते
पण पिलू वेडे उडू लागले एकटे एकटे
झेप घेताच नजरेस पडले प्रचंड नभ ते
केविलवाणे पडू लागले एकटे एकटे

घार उडाली पिलास पाहून
धरिले तिने त्यास सावरून
म्हणती 'बाळा' जग हे वेडे
जगविणारे असतील थोडे

तरी पुन्हा तू नको करूस असले साहस
ना तरी अंगाशी येईल तुझे हे धाडस
पंख फुटताच उड निर्भय तू कुठे
पण उडावे लागेल तुला एकटे एकटे!

# मी न एकटा

समुद्र म्हणतो मीच एकटा
पण लाटांना विसरून
चालेल का त्याला?

आणि हे वेडं आकाश
म्हणतं मला नाही आधार,
पण विसरून ह्या ताऱ्यांना
चालेल का त्याला?

हा भोळा मनुष्य म्हणतो
मीच आहे सर्वश्रेष्ठ; पण
विसरून आकाशातल्या देवाला,
चालेल का बरं त्याला?


# माती

या भ्रष्ट देहाची
दया करू की घृणा?
सोसल्या आहेत याने
मनस्वी दारूण यातना

आहे जोवर याच्यात गंध
येतील सारे भुंगे असंख्य
न जाणो हा मधू हरवता
येऊन सगळे मारतील डंख

अधिक छळ सोसण्याआधी
हे शरीरंच नष्ट व्हावे
ज्या मातीतून आले आहे,
त्या मातीतच मिसळून जावे

# तपश्चर्या



असहाय्य मी
अगतिक मी
बुद्धीच्या अभावी
निरर्थक मी
ध्येय नसल्याने
गतिशून्य मी
पुढील भवितव्याविषयी
भावशून्य मी
करावं असं खूप वाटतं
आयुष्याला अर्थ आणावा,
शारदेला पुजून; पण
तपश्चर्येवाचून ती
लाभत नाही, हेच खरे...
अखेर हेच खरे...!

*मार्च ७८*

# भंगलेली शलाका

आज एवढचं कळतंय मला
माणसाला फक्त शरीरच असतं
त्याच्या बाहेर मग त्याला,
आणखी वेगळ जगंच नसतं

वासनेच्या आगीत जळताना
पडतात किती मनांच्या आहुती
शरीराची भूक भागल्यावर
सहजच होते त्यांची विस्मृती

माणसाचं माणूसपणंच संपतं
कारण पशूसुद्धा जवळ येतात
जीवनाचा अर्थच बदलतो,
जेव्हा त्या पातळीवर पोहोचतात!

*मार्च ७८*

# क्षितिजापलीकडे

मला जायचं आहे दूर
या जगाच्या पलीकडे
जिथे असेल फक्त
खऱ्या चेहऱ्यांचाच वावर
उगीच खोटे मुखवटे
नसतील जगत ज्या जागी
तिथेच मला जायचं आहे!

मी काय आहे एवढं
समजून वागतील
जे चेहरे माझ्याशी,
करणार नाहीत ढोंग ते
मी आवडल्याचं
मला समजून घेतल्याचं
तिथेचं मला जायचं आहे!

माझं मन ओळखल्यावर
येणारच नाही प्रश्न,
रागवण्याचा माझ्यावर
पण करतील केवळ
प्रेमच माझ्यावर....
अशाच एका अनोळखी
जगात जायचं आहे...
मला दूर जायचं आहे...
या क्षितिजापलीकडे
किंवा...
त्याच्याही पलीकडे...!

८-७-७८

# अनामिका

गोष्ट तशी साधी भारी
आहे मात्र भोळी खरी
उगा तिला लाजवू नका
भलती नावं ठेवू नका

तिच्या ओठी अनेक सत्य
होऊन जातात सहज मुक्त
अंतरी लपवून आपुली वेदना
सतत राहते सुहास्यवदना

तर ही गोष्ट अनामिका
आहे एक शोकांतिका,
हिला तुम्ही नाव द्यायला
जन्मभरची सवड काढा

नाहीतर हिला वाचूच नका
भलती नावं मात्र ठेवू नका


५-११-७८

# पंखा

जीवन असावं पंख्यासारखं
स्वतःमध्ये ना गुंतणारं
स्वार्थीपणाची सोडून साथ
इतरांना फक्त सुखविणारं

स्वतःचं समर्पण करताना
हा गरागरा फिरतच राहतो
दुःखाच्या उष्णतेने भाजताना
शरीराची तगमग शांत करतो


ह्याच्या त्यागाला शब्द नाहीत
आपणच जळून राख व्हायचं
आपपर भाव न बाळगता
भोवऱ्यासारखं जीवन जगायचं!



# नागीण

आपल्या प्रियाची वाट पाहत
युगानुयुगे ही वसुधा अशीच उभी
मीलनाच्या आशेवर ताटकळत
हृदयात धुमसतो ज्वालामुखी

तशीच ही सरिता नागीण जशी
आतुर निळाईत सामावण्यासाठी
बांध घालताच उभारून फणा
फुत्कारत येते गिळण्यासाठी



# रिता प्याला

डोळे उघडून पाहिलं तेव्हा
जग फारच सुंदर भासलं
पण भविष्याच्या जाणिवेने
ओठांमध्ये रडू फुटलं

बालपणीचे पंख लावून
उडाले मी आकाशात
प्रत्यक्षात मात्र राहिले फिरत
एका प्रचंड आवर्तात

आठवणींच्या वादळाने
जीवनाचा ओघ हरवला
सुखाच्या महापुरातही
माझा प्याला रिताच राहिला...

# चोट

कहते है ये जिन्दगी
है सिर्फ जीने के लिए
जीने नही देती अगर
जालीम दुनिया, कैसे जिए?

कहना आसान है उनको
जिन्हे गहरी चोट ना पहुँची हो
हो जाए उनका हाल भी ऐसा
कहेंगे हमसे, कैसै जीते हो?

हमने बहुत मरना चाहा पर
सब गम शिकायत कर गए
आप अगर बिछड गए हम से
हम तो बेसहारा, बेघर हो गए !

११–११–७८

# जुदाई

आप से जुदाई का दर्द
गमे दिल सहा नहीं जाता
फिर होगी ना मुलाकात
ये खयाल सोचा नहीं जाता

चंद घंटो की पहचान में
हम हो गए आपके यार
चाहे हमे भूल भी जाओ
कभी कम ना करना प्यार

कभी देखे जो बदनसीब
हमें ही याद किया करना
हमारे दुखों की खातीर
दो आँसू तो बहा देना

११–११–७८

# प्यासी आत्मा

ये दिशाहीन, अन्तहीन सागर
मैं पार तो कर के आ गयी
जाने क्यूँ हर तरफ प्यार पाकर
मेरी आत्मा बस प्यासी रह गयी

भर भर के बादल तो बरसे
प्यासी धरती भी गुनगुनाने लगी
बेसहारे आसमाँ से फिर आँसू छलके
उसके आत्मा की जो प्यास जगी

प्यासा सागर, प्यासा बादल
कर्म का ज्ञान पिलाकर गीता प्यासी
सब के मन मे रहकर पागल
श्रद्धा की आत्मा प्यासी प्यासी....

१७–१–७९


# पाऊलखुणा

एका ढळत्या सायंकाळी
एकटीच बसले कातरवेळी
स्मृतींचे शिंपले वेचीत-
मोती शोधीत होते खुळी!

या वाळूवरल्या पाऊलखुणा
हळूच विचार आला मना
नेतील जर ना लहरी लाटा,
अंतापर्यंत राखीन त्यांना!

वाटले करावे समर्पण
याच्या पायी सारे जीवन
जोवर आहे सोबतीला
आठवणींची एक गुंफण!


२१-१-७९



# खडक

माझ्या शहाण्या, सोशीक मना
का रे असा कोसळलास आज?
समुद्रातला तू खडक हो ना
त्याचे प्रचंड धक्केदेखील
सहन कर तू ठामपणे
कोरडाच राहा, उगीच
गाळू नकोस डोळे, नाहीतर
हसत हसत सगळेजण
म्हणतील काय ठाऊक आहे?
दगडाला फुटला पाझर...
शांत हो, शांतच राहा
तपस्वी बगळ्यासारखा
मिटून डोळे एका पायावर
एखादा एकटा जीव कधी
घेईल तुझा निवारा....
कदाचित, असंच एखादं
अशांत कोसळलेलं मन
सावरेल तुझ्या शरीरावर
आणि जपेल ते स्वतःला
होण्यापासून एक खडक...!

२६-१-७९



# सहेली

ऐ मौत आएगी तू बता कब
गमे दिल को है इन्तजार बहुत
कोई राह देखे होकर बेताब
कटती नहीं जिन्दगी ढलता है वक्त

अब तक किसी ने तुझसे बोल
किया था क्या इतना प्यार?
कब तक मुझे तडपाएगी तू
आ जा मत करना इन्कार

बनकर मेरी सच्ची सहेली
थके हुए ये हाथ थाम ले
बरसों से तरसी है नजरें
अब तो हमे गले लगा ले!

२६-१-७९

# राज


अब नजरें झुकाकर चलते है
कहीं ये दगा न देती जाए
राज छुपाना तो नहीं आता है
दिल की बात पलकोंपर लाए

जानकर भी जो अन्जान बनते है
फिर कोई कहे क्या उनसे?
अपने मन को सँभालते है
जब मुलाकात होती है उनसे

अब मरकर भी जिन्दा हैं
जिस दिन से जान गए हम
वोही कहीं दिल खोए है
जिस दिल पे मरते है हम

सीकर लबों को जीना है
जिन्दगी तू भी रह खामोश
दिलको सिर्फ सहना है
जब तक ना उड जाए होश!

५-२-७९



# इंद्रधनूसम भेटींची....

मी कधी तुझ्याकडून अपेक्षिली
सोबत, आयुष्यभर राहण्याची?
माझ्या उदास मनाला होती आस
फक्त सहवासाच्या इंद्रधनूची

आपल्या थोड्याशा भेटींमध्ये
सात क्षणिक रंग उमटावेत
डोळे भरून पाहत असतानाच
क्षणांत ते नभात दडावेत

तू गेल्यानंतर दूरदेशी
मला सोबत सप्तरंगांची
तुझ्यासाठी आळवीन भैरवी
अनोख्या मी सात स्वरांची

१३-२-७९

# टूटता तारा



ये भी कैसी जिन्दगी है
जहाँ खुद को छुपाकर हम
अजनबी बनकर जीते है।

रात की तनहाई छाती है,
नकाब उतारकर सारे गम-
आँखो में ढल के बहते है।

अब कांटों से दामन उलझा है,
और याद आते हो तुम
जब गुलाब कहीं खिलता है।

सागर का किनारा खोया है
अब जिन्दगी भी है कम
आसमान से एक तारा टूटता है।

१४-२-७९

# खोज अपनेपन की

मैं गगन देख रही थी
कहीं से चला आया बादल
झूमकर बरसा, और
मैं चौंक पडी सुनकर
जब कहने लगा वो मुझे
प्यास बुझा, मैं हूँ तरसा...

फिर कहीं से चमक उठी
बादल के पीछे बिजली
मैने सोचा इसी से पूछ लूं,
पर फिर वोही बोली-
तुमने देखी क्या कहीं पर
मेरी खोयी हुई रोशनी...


अपने आप से घबराकर
जहर उठा लिया मैने
पर रखा वहीं लौटाकर
बिना किए कुछ शिकवा,
जब उसी ने मुझसे कहा
चल मुझे तू मौत से मिला....

कैसा अजीब दिन है आज
इसी खयाल में खोयी
चल पडी मैं किनारे जब,
ओह, फिर से ढलते दिन ने
मुझे पुकारा देकर आवाज
कहा, कल आऊंगा फिर
शायद कल मेरा सवेरा होगा....

इसी परेशानी में मुझे
कोई आदमी मिल गया
हो गयी इस से पहचान
और भरोसा कर के मुझपर
अजनबी ने एक सवाल किया
क्या आते आते रास्ते में
कहीं तुम्हे कोई इन्सान मिला....

अब मैं तुम से पूछती हूँ
क्यूं की हार गयी हूँ मैं
सारा आलम खोज आयी
कहीं भी उसके निशाँ नहीं
तुम ही अब बता दो ना
इस जिन्दगी से गुजरते वक्त,
तुमने श्रद्धा का 'भगवान' देखा...

१८-२-७९




# पाठशिवणी

असे काही प्रसंग
जिव्हारी लागतात
काळाच्या प्रवाहात
विसरुनही जातात

वाटतं, सारं विसरलं
असतं मनांत लपलेलं
येऊन सतत देतं टोचणी
आणि खेळतं पाठशिवणी

# सिगरेट की व्यथा



मुझे नफरत से देखनेवालों
ये सवाल करती हूँ तुम से
पहले दो जवाब इन सबका
फिर करना शिकवा मुझ से

कहो कब मैंने इन्हे पुकारा
और कहा लगालो गले से
ये अपना गम भूलने आए
खुद चल के अपने घर से

मैं जलती रहीं बन के राख
देने परेशाँ दिलों को खुशी
मिल के कदमों तले मिट्टीमें
हमेशा कहलायी मैं ही दोषी

इन से शिकायत है मुझको
जो कहते थे कभी मुझे अपना
जब चले खुद मिलने मिट्टी में
कह गए इसे ना अपनाना

अब कहो किस की है खता
किस ने किया किसे बरबाद
जिस की जिन्दगी गुजरी तनहा
या भूल गए जो होकर आबाद!


२०-२-७९

# चंदनस्पर्श

कशी ही घडली किमया
नजरेतला भाव बदलला
तू मला रे भेटता प्रिया
जीवनाचा अर्थ उमजला

तुझ्या चंदनी स्पर्शामध्ये
दुःख कधीच विरून गेले
तुझ्या प्रेमाच्या चांदण्यात
आयुष्याचे सार्थक लाभले

आता तू कितीही रुसलास
तरी मला खेद ना खंत
मला सोडून दूर गेल
तरी ठेव आठवणी



तुझी अबोल शब्दफु
हृदयी मी सदा जपी
माझी भोळी अबोल प्रीत
गुंफून फुलांत तुला वाहीन...

२४–२–७९

# वेगळी

हे ठाऊक आहे मला की तू माझा नाहीस
शेवटी तू देखील माणूसंच आहेस देव नाहीस

मी मात्र फक्त मनानेच तुझी राहू शकते
कारण हे शरीर विरलं तरी मन इथे ठेवू शकते

उद्या मी घेईन कदाचित अखंड झोप शेवटची
तू मला जागवू नकोस हीच इच्छा शेवटची

मी गेल्यावर क्षितिजापार रागावू नकोस तू
माझे प्रेम स्मरून नको आणूस डोळ्यांत समुद्र तू

माझं वेगळेपणं जाणवून म्हणशील तू मला वेडी
ह्या सर्व शहाण्यांपेक्षा आहे ना रे बरी मी वेडी?

२४-२-७९



# कविते

कविते, आज का गं झालीस परकी
तूच ना मला जगायला कारण दिलं
आत्ताच तू अशी का झालीस मुकी
जेव्हा माझं मन तुझ्याशी बोलू लागलं

तू नेहमीच माझ्या हृदयात राहिलीस
माझ्या सुख-दुःखांत होऊन भागीदार
आता तूच जर अशी माझ्यावर रुसलीस...
कशी सोसू मी ही सगळी दुःखं अपार?

२७-२-७९

# एहसास

जीवन तुम से अब प्यारसा होने लगा है
पर मजबूर है हम मौतसे वादा जो हुआ है

अब तक कहाँ छुप गए थे होकर उदास?
हमने कितनी राह देखी पर मिटना सकी प्यास

बचपन में ही तुम मुझसे बिछड गए ऐसे
और आए जब हम डर गए है जवानी से

चले जाओ कहीं वरना बढेगी जीने की आस
जिन्दगी की सच्चाई का होने लगेगा एहसास

१-३-७९

# शरीर



आज सगळं जग भासतं आहे खोटं
उगीच सगळ्यांना सत्य सांगत बसले
समजून कोणी घेतलंच नाही, फक्त
वागण्यातून सगळे दाखवतात तिरस्कार
वाटतं यांचा खोटेपणा, फसवेपणा
क्षणात नखांनी ओरबाडून टाकावा
रक्तबंबाळ करावं यांच्या चेहऱ्यांना
ह्या सगळ्या दगडांची मनं कुठं लपली
आहेत त्यांना खेचून बाहेर काढावं
शरीर म्हणजेच सर्वस्व समजणाऱ्यांना
वरची कातडी काढून दाखवावी असं
कित्येकदा वाटलं, प्रयत्नही केला
कीव येते मला आता सगळ्यांची
हे सारे कातडीच विकायला निघाले
मिळेल त्या किमतीत आणि वर
घाणेरड्या शरीराचं कोडकौतुक पुरवायला
दोन्ही हात झटकून तयार
मन गाडून शरीराच्या पूजेला तयार...

१६-३-७९

# रेषा

माझ्या डाव्या हातावरच्या रेषा
ठळक व्हायला लागल्या आहेत
आयुष्याची रेष पुसण्याचा मी
निष्फळ प्रयत्न केला
पण त्यातून निघालेल्या
रक्ताच्या काळपट भासाने
ती जास्तच स्पष्ट दिसू लागली
खरोखर का या रेषा असतील
घडविणार माझं पुढील भविष्य
की नुसता सुंदर असा एक
नशिबाचा आभास निर्माण करतात?
ह्या वेड्या रेषेला आता
मीच सांगणार आहे तिचं भविष्य
जेव्हा मी असेन ना चितेवर
अपूर्णतेत धगधगत शरीराने
तेव्हा, तू मात्र तशीच असशील
माझ्या हातावर पूर्ण आयुष्य दाखवत....

१६-३-७९

# प्रतिबिंब


तू कसा आहेस हे तुलाच अजून समजलं नाही
रोजंच तू स्वतःला पाहत असतोस तरीही

हे आकाश तुझंच रूप हे आधी जाणून घे
त्याच्याकरता ही पृथ्वी सर्वांगाने तगमगते आहे
आणि माझ्याही मिठीत आकाश येतंच नाही
तू कसा आहेस हे तुलाच अजून समजलं नाही

तू समुद्र आहेस हे तरी तुला ठाऊक आहे का?
नसेलच, कारण तुझा खारटपणा माझ्या ह्या
सदैव वाहणाऱ्या उदास डोळ्यांत साठलाय
त्या सागरासारखाच तूही भोळा आणि निष्ठूर
तो मला तहानलेलीच ठेवतो नेहमी अन्
त्याला ओंजळीतून पिणं मला काही जमत नाही

तू कसा आहेस हे तुलाच अजून समजलं नाही
रोजच तू स्वतःला पाहत असतो तरीही..

१७-३-७९



# मुलाकात

काश हम कभी ना मिलते
ना हमारी मुलाकात होती
ना हम अपना दिल खोते
और मन में ये उदासी रहती

जब से तुम्हारी हुई पहचान
मुरझाया दिल का फूल खिला
जैसे जैसे हम मिलते गए
लगा है, खोया मीत मिला

तुम्हे किस तरहा बताएँ अब
हमारी बेचैनी की हकीकत
रोज मिलना हम चाहते है
पर तुम्हे मिलती ना फुरसत

१८-३-७९

# तलाश

भला क्यूं सोचती हूँ मैं हर पल
खोकर खयालों में क्या पाती हूँ
अब तक ना समझ पायी हूँ मैं
फिर भी विचारों में बह जाती हूँ

जाने मुझे किस की है तलाश
और क्या खोजती रहती हूँ मैं
शायद मौत को ढूँढ रही हूँ
जिन्दगी जो खो चुकी हूँ मैं

किस लिए ख्वाब देखती हूँ मैं
जो टूटने के लिए ही बनते है
कुछ देर तो जी है बहलता
आँख खुलने पर दिल रोता है


२४-३-७९

# जूता

मैं हूँ एक पुराना जूता
मालकिन ने मुझे बेच दिया
आधेसे आधी कीमत में
मेरे साथी से अलग किया

मैं इन के कदमो को
कांटो से बचाता रहा हूँ
मेरा बदन सहता रहा पर
इन के लिए मिटता रहा हूँ

एक यौवना के मैं काम आया
जिस के पग में था मैं सजता
जब उसे किसी मजनू ने छेडा
यकीन से बोली, खायेगा जूता?



उसे इतना भरोसा था तब
जब उसपे रही थी गुजर
ब्याह मे मिलते ही नए जूते
मुझसे कहा अब तू भी गुजर

मैं भला करता भी क्या
चमडे का जो मैं बन गया
जिसने सिर्फ सहना सीखा
बनानेवालों से ना गिला किया

जिनकी चरणों में रहता हूँ
उसी आदमी से ये सीख मिली
जैसे भी कुम्हार ने बनाया हो
मिट्टी ने जुबान ना खोली

मैं खुद से इतना ही कहती हूँ
तुझे पहननेवाले आदमी है, पर
उनमे बसता हो देव या शैतान
तू बस अपना फर्ज अदा कर!

# स्वप्न



माझ्या मानसीच्या स्वप्ना
डोळ्यांतून ओसंडू नकोस
तुझं पूर्णत्वाशी वाकडं आहे
म्हणूनच मला भीती वाटते
अपूर्णतेच्या अपयशापायी
तू 'स्व'त्वच गमावशील
अन् मग मला एक दिवस
तुझं स्वप्न व्हावं लागेल
जे असेल पूर्ण, अभंग
पूर्णतेच्या सुखात शांत
कोसळणारं, स्तब्ध....

# कबुली

माझ्या चुकांची कबुली मी
चुकून दिली का तुझ्यापाशी?
वाटलं, तू जाणशील मला
आकाशापेक्षा मोठा होऊन
क्षमा करशील मला तू
शेवटी तू आलाच नाहीस
पृथ्वीने कबूल केले होते
आभाळापाशी आपले मन
पण त्याने निदान, क्षितिजाजवळ
तिला मिठीत घेण्याचा एक
आभास तरी निर्माण केला...
तूच का त्याच्यापेक्षा छोटा होतोस?

१६-६-७९

# अंदाज

मी केलेले तुझ्याबद्दलचे
सगळेच अंदाज खोटे ठरावेत
तू असा 'पण' उचलला आहेस?
वाटलं होतं, तू येणार नाहीस
पण, तू क्षमा केली होतीस
मी तुला ओळखलं अन् नाहीही
समुद्राच्या तळाचा अंदाज आला
तू आलास तसा निघूनही गेलास
त्या क्षणी मला अमावास्येच्या
काळ्या रात्रीचं दुःख उमजलं
कारण, चंद्रही असाच तिला
आपल्या अस्तित्वाची फक्त
जाणीवंच देऊन माघारी जातो!

१७-६-७९

# ठेस

मेरे मरने के बाद तुम
नहीं आना मुझे देखने
कहीं फिर मेरी आत्मा
बुनने लगे मीठे सपने

मैं तुम बिन जी नही सकती
तुम यही सोचते रहना
पर अकेली मर सकती हूँ
यह मत भूलते जाना

तुम्हारे झूटे आसूँओ पर
मुझे यकीन हो जाएगा
उन्हे होठों से पीने को तब
दिल तडपकर उठेगा

जख़्म पर वार करना तो
तुम्हारी पुरानी आदत है
मेरे आँसूओ को हँसते हो
ये ही तुम्हारी दानत है

मेरे दिल को ठेस लगे
ये ही  तुम्हारी आरजू थी
मैं जीते जी मरती रहूँ
ये ही तुम्हे तमन्ना थी

१४-१-८०

# डाकिये

डाकिये, काहे भूले मेरा घर
मैं तोहे जाते देखूँ दर दर
हमरे नैन थाके री भैया
लागत जैसे भूल गए सैंया

मैं तोरी बाट जोहूँ है कब से
गए परदेस बलमवा जब से
फिर खोज झोली, डाल इक नजर
जरूर भेजेंगे वो कोई खबर

भैया, हमसे यूँ रुठीयो ना
मैं अब तोसे बार बार पूछूँ ना
पर, कल इधर आना भूलीयो मत
आयी होगी हमरी चिठ्ठी या खत



# असर

क्या मेरी मुहब्बत में असर कोई नहीं
सब कुछ लुटाकर भी तुम पे असर कोई नहीं

तेरी याद में होशो-हवास उड जाते है
मेरे बचने की अब उम्मीद कोई नहीं
सब कुछ लुटाकर भी तुम पे असर कोई नहीं

बात बात में वो दिल तोडे जाते है
मेरे तडपने में क्या असर कोई नहीं
सब कुछ लुटाकर भी तुम पे असर कोई नहीं

चाँद के साथ सब चराग बुझ जाते है
शमा के जलने में क्यूँ असर कोई नहीं
सब कुछ लुटाकर भी तुम पे असर कोई नहीं

४-२-८०

# माध्यान्ह

माध्यान्ह टळता माथ्यावर
नको वाटते मला जावे
ओसाड सागराकाठी त्या
ओहोटी लागली असते जेव्हा,
बिचारा खिन्न झालेला असतो
अगतिक प्रियकरासारखा तेव्हा
कारण अश्रू सारे हरपले असतात
कुठे बरं जात असेल ते पाणी?
क्षितिजाची फक्त रेषच दिसते
तिच्यात सामावत असेल का?

छे, इतका का तो क्षुद्र आहे
प्रेमात अगतिक होण्याइतका?
मला तर वाटतो तो एका
सर्वस्व त्यागलेल्या योग्यासारखा
मोहपाश दूर सारलेला,
भावनांना विसरून सगळ्या,
आपले अश्रु दूर करणारा
म्हणूनच नको वाटते मला जावे
पूर्ण रिक्त त्या समुद्रकाठी
ओहोटी लागली असते जेव्हा.....

१५-३-८०

# आभास

तू स्वप्नी येतोस माझ्या
काजळकाळ्या रात्रीस रे
हाती घेतोस हात माझा
पाऊल अडखळता माझे रे

माझी मीच मिटून जाते
काय बोलावे तेही न कळते
उमजत नाही काही केल्या
तो आभास की सत्य होते!


पुन्हा तू सामोरा येतोस
स्वप्नातील सत्य हाती येते
हर्षाने जाग येताच कळते
ते स्वप्नातील सत्य होते

२९-३-८०

# का?

तुझ्यामुळे आकाश निळं
की आकाशामुळे तू निळा?
ह्या 'का'चं उत्तर शोधत
माझा जीव होतो खुळा

पौर्णिमेची येता चांदरात,
का रे तू होतोस पिसाट?
ही ओढ मनांत साठवत
मीही होते भरतीची लाट



# पाऊलखुणा

आताच मी सारवलं घर
उमटविसी का पाऊलखुणा?
माझ्या मनीच्या रे अंगणी
ओल्या जखमेच्या खुणा

कितीक केले बघ यत्न
परि जाती ना हे व्रण
बुजवू जाता तुझी याद
येते आणिक आठवण

घेऊन डोळ्याच्या रे पाण्या
चालते मी जपून जपून
तो पडे भोवतीने तुझ्या
माझे पाऊल रुतून रुतून

# साया

यूँ तो राह में बहुत मिलते है
पर कोई मेरा अपना नहीं मिलता
दिल जाननेवाले की तलाश है
पर हमे उसका ठिकाना नहीं मिलता

न जाने कहाँ जा छुपा है जालीम
कैसे ढूँढू उसे इन झूठे चेहरों में से
कहीं उसे खोजते न बीत जाए ये जनम
कैसे चुनूँ मैं अपना फूल बहारों में से

सपने में तो तुम्हें पहचान सकती हूँ
लेकीन तस्वीर में तुम नही उतरते
मैं तुम्हारा साया बनना चाहती हूँ
लेकीन तुम सच्चाई मे नहीं मिलते

२०-१२-८१



# कफन

बिना प्यार के बाजार में बिक जाते है बदन
दिए दाम से बिना रूह के बिक जाते है बदन

ना होते ये बदन तो कहाँ जाते ये जानवर
बहू बेटियाँ ना इज्जत को कर सकती थी जतन
दिए दाम से बिना रूह के बिक जाते है बदन

सरी जिन्दगी लोगों को रिझाते रहे ये जिस्म
मरने पर इन जिस्मों को मिल सकता ना कफन
दिए दाम से बिना रूह के बिक जाते हैं बदन

# कोयल



ओ मुसाफिर, चले जाओ
ये सराया टूट चुका है
देखो, दिवारें भी गिर गयी है
पता है, इस बीचवाली दिवारपर,
एक कोयल का घोंसला था
वो उसे रोज अरमानों से सजाती
रोज नए गीत गाती, और फिर गाती
अब भी वो है पर ,
अब वो चूपसी रहती है
तुम भी यहाँ ना आओ
इस सराये ने कितनोंको दिया है सहारा
कितनों के हैं दुख सुने, गम सहे
पर सभी चार दिन के महमाँ थे
अपना गम मेरे साथ छोड चले गए
इसी गमों के बोझ से मेरा दिल टूटता गया
और कोयल चुप होती गयी
इस के बाद ना बीचवाली दिवार खडी रहेगी
न दिल के साथ कभी कोयल गीत गाएगी

२२-८-८१



# होरपळ

जाताना सारं जीवनकाव्य घेऊन गेलास
माझं सुनं मन रिकामं करून गेलास
तेव्हासारखे शब्द लेखणी धरत नाहीत
बोलके शब्दच निःशब्द करून गेलास

शरीरातील आत्मा सहजच काढून नेलास
कुठे फिरू रे मी मन न् आत्मा शोधीत?
रितं शरीर आता तग धरू पाहत नाही
मेल्या मनाला अधिकच मारून गेलास

सारं कसं नीरस उदास करून गेलास
श्रावणातील हिरवळ सारीच गेली जळून
मी वसंताची वाट बघत होरपळले रे
तू तर जळत्या जीवा आग लावून गेलास...

६-८-८१

# तुम मेरे न रहे

हम आपको खाबों में क्यूँ लाएँ?
जब आप की रातें मेरी ना रही

वो वादे वो कस्मे क्यूँ कर याद करें?
जब आपकी वफाही मेरी ना रही

आप की याद तो रात रात नहीं आती
जब के आपही अब मेरे ना रहे

उस कलम की सियाही और खत क्यूँ न भूलें?
जब वो लिखनेवाले हाथही मेरे ना रहे

तेरी गलीयों में आने की कोशीश ना रहेगी
जब तुम्हारा घर-आंगन ही अब मेरा न रहा

# बकुळीचे गीत

हे बकुळीचे गीत लाविले मी तुजसाठी
प्रत्येक शब्द फुलला केवळ तुजसाठी
मी सिंचली अविरत अबोल प्रीत त्यावरती
सुकलेले शब्द माझे अजुनी दरवळती तुजसाठी

हे जीवन जगले मी फक्त तुजसाठी
प्रत्येक दिवस वेचला केवळ तुजसाठी
साऱ्या सुखांची वाहिली श्रद्धांजली त्यावरती
सुकलेले अश्रू माझे अजुनी ओघळती तुजसाठी

# सागर अन् आकाश

तुझं हे असं झिमझिम, धो धो बरसणं
न् त्याचं ते धुक्यात लपेटून जाणं
तुझं सतत टिपं गाळत राहणं
तर त्याचं बेफाम किनाऱ्याकडे धावणं
शेवटी तुम्हा दोघांचं क्षितिजाकडे
एका रेषेत एकमेकांत सामावून जाणं
अन् -
असं झालं की माझं उदास उदास होणं
मग जाणवणं की तुम्ही तर दोघेही माझ्यातंच आहात
त्याक्षणी सुरू होतं माझ्या...
डोळ्यांत आकाश अन् देहांत सागर उतरणं
अश्रूंचं झिमझिम, धो धो टिपं गाळत बरसणं
अन् भावनांच धुक्यात लपेटून बेफाम बेलगाम धावणं

# कुंती का दान

मेरा आंचल भी कम पडे ऐसा
मुझे कुंती का तुम दान दे दो
मेरी चिता मे ना कम पडे ऐसी
मुझे वीर कर्ण की भूमी दे दो

वो सदा जीवन में साथ रहें
ऐसा सीता का बनवास दे दो
मेरी श्रद्धा ना कभी ढल सके
ऐसी शबरी की शक्ती दे दो

उन्हे पलभर ना भूल सकूँ ऐसा
राधा और मीरा का प्यार दे दो
उनकी राह में पलके बिछी रहे
ऐसी ऊर्मिला की निगाहें दे दो

उस जोगी को इक बार देख सकूँ
इतनी ही उमर का बरदान दे दो
अब और कुछ ना माँगू हे भगवन
बस अपने चरणों में जगह दे दो




# अद्वैत

जितकी सहज संध्याकाळ होते
तितकंच सहज मरण यावं
आणि जशा चांदण्या विझतात
तेवढ्याच सहजी मी मिटावं

पहाट जशी निद्रेच्या कुशीत असते
तसंच मी तुझ्या मिठीत असावं
क्षितिजाच्या रेषेइतकंही मग
आपल्यामध्ये द्वैत नसावं

अशी कसली ही अगम्य ओढ
माझ्या नकळत तुझी वाट पाहते
पूजेस मी बसता नकळे कशी
तुझ्या नावाची मग माळ जपते



# कडा

आयुष्याची ही अवघड वाट
कुठवर जाणार आहे नी,
किती चालावं लागणार आहे
ठाऊक असतं तर बरंच होतं
चालून चालून पावलं थकली
पण विसावून चालायचं नाही
वाटतं किती वळणं अन् वळसे
पुढच्यांनी केलेल्या पाऊलवाटा
कित्येक वेळा मोह होतो
छोट्या वळणांवर वळायचा
पण, असं करून चालणार नाही
सरळ वाटेनंच गेलं पाहिजे
निर्णय घ्यायचीदेखील असते
जीवनात फक्त एकच वेळ
योग्य निर्णय, योग्य वाट
काही वाटा अशाच जीवघेण्या
आपल्या सौंदर्याने मोहवत
आणून सोडतात उंच कड्यावर
जिथे समोर फक्त दोनच मार्ग
उडी मारायची किंवा परतायचं
पण परतूनदेखील पुन्हा
बरोबर वाटेला जाऊन मिळू
अशी, पावलांनाही नसते शाश्वती
वेळीच सावरणारं कोणी भेटलं
तर पावलांचं नशीब, नाहीतर
कड्यावरून उडी घेऊन, पावलांनी
द्यावी स्वतःलाच विश्रांती !!!

२८-२-८४

# प्राक्तन

प्रत्येकाचं प्राक्तन असतं
अन् नशिबाचा भोग असतो
नंतर काही म्हटलं तरीही
ह्यात देवाचाही दोष नसतो

शेवटी सगळं मानण्यावर असतं
अन् शब्दांचाच तर खेळ असतो
सुखात काय नि दुःखात काय
त्यात, आपला कोणी सोबती नसतो

सगेसोयरे न् नाती-गोती, पण
अखेर कोण कुणाचा असतो?
साता जन्मांचा सखादेखील
वेळ आली की आपला नसतो

२९-२-८४

# अनमोल मोती

ना मन को चैन और जी को सुकून
कैसा यह दिन-रात का रोना है
दिल का दरवाजा खोल कर देख
जिन्दगी का मौसम मस्ताना है

दुनिया में तू ही नहीं जिसे
गमों के अंधेरों ने घेरा है
दूसरों को कोसना छोड दे तू
ये अपनी किस्मत का फेरा है

कही आँखो का सागर ना सूखे
हर बूँद पुकारकर कहती है
अश्क यूँ आसानी से बहाते हो क्यूँ
ये तो बडे अनमोल मोती है

२९–२–८४

# तुम कौन हो?

ये जो मेरे शब्दो में तुम हो
सारे  तन-मन पर छाए हो
मैं कहाँ कहाँ तुम्हे खोज आयी
पर तुम अबतक अन्जान हो

मेरी शायरी की तडप तुम हो
इतने दिलो-दिमाग के समीप हो
किन गुनाहों की सजा है यह
के तुम आजतक गुमनाम हो

इन गीतों की प्रेरणा तुम हो
तुम ही तो मेरी प्रतिभा हो
कौनसा नाम दूँ मनमीत तुझे
तुम मेरे जीवन का आनंद हो

कविता की गहराई तुम हो
कैसे कहूँ बेनाम अजनबी हो
ऐ आकाश, ओ सागर मेरे
तुम ही तो मेरे सबकुछ हो

५-३-८४

# इकरार

तेरी बातों में थी कोई शराब सी
बिन पिये जो चढी हम पे नशा सी

ना मयखाना, ना साकी, न कोई जाम
मेरे शेरों की मय से भेजूँ तुझे पैगाम

तेरे आने से महफिल मे हो जाए कयामत
ये दिल न सँभलेगा तो आएगी आफत

वादों पर तेरे जो करूँ मै एतबार
ऐसा न हो उम्र बीते और तू करे इन्कार

लडखडाते इन कदमों को आएगा करार
जरा से प्यार का तू जो कर दे इकरार

६-३-८४



# झोका

उंच झोका घ्यावा वाटे मज
पारंब्यांच्या झुल्यावरती
एक पाय टेकून खाली, मग
अजून वर अन् आणिक वरती

झोका जावा पार गगनी
विचारांनाही यावी गती
आभाळाला पाय लागता, मग
स्वप्नी सारे रंग सजती

लागे समाधी झुलता झुलता
देह मनाचे भान हरपती
प्रत्येक झोक्यासंगे, मग
एकेक वर्ष मागे मागे सरती

१०-३-८४

# कहाणी

सारेच मज विचारती सांग तुझी कहाणी
परि सांगायच्या आधीच का थरथरे पापणी?

असते इच्छा मनी सुरस ऐकायची भारी
माझ्या हृदयीची ढळते आधीच सारी उभारी
उभ्या उभ्या शरमेने हो झाले मी दिनवाणी
परि सांगायच्या आधीच का थरथरे पापणी?

कशी बोलू, उठेल मग मोहोळ आसमंतात
कशी गप्प साहू उठलेले काहुर अंतरात?
असह्य होउनी आले अगतिक डोळ्यांत
पाणी
परि सांगायच्या आधीच का थरथरे पापणी?

भरली मैफिल आता चर्चा चाले जोरात
उरांतले दुःख असे आज आले बाजारात
आता कशांस ऐकाल तुम्ही कथा पुराणी?
परि सांगायच्या आधीच का थरथरे पापणी?

*८-४-८४*

# खुदगर्जी

जरासी बातों के ना बननेपर
रहूँ तुम्हे बार बार कोसती
और ऐसा भी नही होता के
मेरी तुमसे श्रद्धा है ढलती

ये कैसी एहसान फरामोशी है
था तेरी खुदाई पर वहम
खुद को ना माफ करूँ मै
जो भुलाऊँ तेरे सारे रहम

गर सपने मे भी भूलूँ तुझको
गुस्ताखी की दे दो ऐसी सजा
कभी सुख ना देना मुझको
ताकी तेरी भक्ती का लुटूँ मजा

८-४-८४

# रूठे नसीब

नसीब रूठे, भाग रूठे, तुम रूठे तो कोई नई बात नहीं
दोस्तों की जुदाई तो हमारे लिए कोई नई बात नहीं

अब जीकर भी देखेंगे जालीम तेरे वार पर
वैसे मरना तो अपने लिए कोई नई बात नहीं

क्यूँ वफाए उल्फत की कसम खाते हो बार बार
जफाए रहमत से वाकिब, बेवफाई कोई नई बात नहीं

प्यासे दिल को एहले तसल्ली तो दी है मगर
बादलों का बिना बरसे चले जाना कोई नई बात नहीं

सांझ बनी उतरी हूँ तेरी बाहों मे ओ सागर
रात ने आकर मिटा देना तो कोई नई बात नहीं

१८-४-८४

# फरयाद

हम ने कब कहा के हमे याद करो
जो हम याद करें, आप फरयाद करो

वैसे भी थे बरबाद तेरी परछाई बिना
अब याद आकर थोडा और बरबाद करो

ना सुने किसी ने अधुरी ग़ज़ल के ये शेर
तुम तो याद करके हमको ईर्शाद करो

चाँद भी छुप गया हम से मुख मोडकर
सितारों अपनी रोशनी से ये गगन आबाद करो

तू ना पडने दे किसी का साया तक मुझपर
अपनी यादों से अब तो हमे आझाद करो



# गुमराह

दिखती हूँ वैसी नही हूँ मैं
असल में बहुत बुरी हूँ मैं
देखो गलती ना कर बैठना
बडीही नापाक चीज हूँ मैं

हाँ, तुमसे बातें करती हूँ मैं
जरूर दिल की हालत जताती हूँ मैं
देखो यह ना समझ लेना
के तुम से प्यार करती हूँ मैं

कभी आके तंग करती हूँ मैं
अपना बोझ तुझे दे जाती हूँ मैं
देखो यूँ गुमराह ना हो जाना
के तुझे हमसफर चाहती हूँ मैं

२-५-८४

# जन्नत

तुझसे मिलते रहने की
बढती जाती है चाहत
और चाहतें मिटाने की
दिल को पडी है आदत

मुझे समझने में तो
सदा रहे तुम गलत
गुनाह कबूल मैं करूँ
यह कहाँ की शराफत?

जब अदा कर दी मैने
सारी की सारी कीमत
अब माफ करो मुझे
यही माँगती हूँ मन्नत

तुम मुझसे बात करो
इतनी है जी को हसरत
जब तुम बोलो मुझसे
मिल जाए मुझे जन्नत

६-५-८४

# घाव

कित्येक घाव अन
किती एक जखमा
परि ह्यातंच का रे
वाया गेलास जनमा

आसं वंगाळ आयुषं
दिलसं अरे करमा
अन रडण्यात बापा
वाया गेलास जनमा

माय म्हणे पोरी
पूज कुंकवाच्या धरमा
देव जाणून दगडा
वाया गेलास जनमा

७-५-८४

# दगा

बहुत बार हमें कई लोग दगा देते है
फिर इक रोज हम खुद को दगा देते हैं

तय किया था चलेंगे सीधी राहों पर
पर चलते चलते कदम दगा देते हैं
फिर इक रोज...

सोचते थे तुझ से ना मिलेंगे कभी, तो
बेताब बिगडे अरमान दगा देते हैं
फिर इक रोज....

इरादा है तेरी दोस्ती तो पा सकूँ लेकिन
अपने रूठे मायूस मुकद्दर दगा देते हैं
फिर इक रोज....

यकीं था के मुझे समझेगा तू यारब
कभी कभी पर खयालात दगा देते हैं
फिर इक रोज हम खुद को दगा देते हैं

१९-५-८४

# मेरे आत्मज

अँधेरे में जी रही थी
तुम किरण बनकर आये...
अब भी अँधेरा वैसाही क्यूँ?
क्यूँ की तुम सूरज जो नही...
क्यूँ तुम सूरज बनते नहीं?
तुम मिले तो लगा आत्मा मिली...
आत्माबिना शरीर माने मृत्यू...
तुम बिन मै माने -
जैसे धुन बिना गीत
जैसे लौ बिना दीप
जैसे मूरत बिना मंदिर
जैसे सुर बिना संगीत
और हर वो बात जो हो
उसकी आत्मा के बिन.....
मेरी कोख न सही, मेरी ओस हो तुम...
जो मुझ से न बना वो मेरा रूप हो तुम..
कड़ी सर्दी मे निकले ऐसी नरम धुप हो तुम
मुझ से जुड़कर भी मुझ से अलग हो तुम..
अब जहां भी जाओ गम नहीं.....क्यूँ की,
जानती हूँ मैं के अब मुझी में हो तुम......

# गझल

कुछ बात हो तब जाके शेर लिखूँ
पहले दिल टूटे फिर गझल लिखूँ

खत्म हुई कलम की सियाही तो
लेके आँखो से झरता काजल लिखूँ

ना दुख, ना गम, ना दाग-ओ-दर्द
कैसे बारिश, आकाश, बादल लिखूँ?

तू थोडी देर मुझसे जुदा हो जा
फिर तडपते तन से ओझल लिखूँ

सारी बातें हो चुकी जीवन की
अब कुछ काम का, कुछ फजूल लिखूँ

१०-११-८४

# अनकहे फसाने

चीजों की तरह गम भी पुराने होते है
वक्त के साथ हम भी पुराने होते है

काश तू समझता फुलों की जुबाँ
मुरझे दिलों के कई अनकहे फसाने होते है

घाव जो हो गहरा उतने ताजे है निशाँ
ना जीने दे ना मरने, ऐसे निशाने होते है

झुकी आँखे क्या क्या करती है बयाँ
बंद पलको मे जाने कितने खजाने होते है

१३-११-८४

# बसर

कहो इन आंसूओं का घर कहाँ है?
पूछो तो इन से इनका दर कहाँ है?

बेवजह आने की ना आदत है इन को
अश्क रोकें ऐसी मगर दिवार कहाँ है?

इन के साथ पिघलते देखा है दिलों को
पत्थर पिघलें इतना पर असर कहाँ है?

साया भी कभी छोड देता है साथ
आंसूओ जैसा बोलो हमसफर कहाँ है?

दिल को लगते ही ठेस चले आते है
क्या जानू दोस्तों तुम्हारा बसर कहाँ है?

२२-११-८४

# तू हो जा खफा

तू ना बोले तो क्या है
खफा हो जाए तो क्या है?
तेरे गम से मर ना जाएँगे
हो जाएँ दिवाने तो क्या है?

सागर में तुफान उठते है
वैसे दिल में शक उठते है
बिना किये कोई पूछताछ
कभी दोस्त यूँही रुठते है

जीवन में ऐसे भी मकाम है
चाहे कुछ करो ये अन्जाम है
तेरा नाम लेने से क्या होगा
हम बहुत पहले से बदनाम है

१-१२-८४

# अधूरी दास्ताँ

यह भी क्या मजबूरी है
जिसे चाहो पाना जरूरी है?
जब प्यार का इजहारही ना हो
कैसी अजब दिलों की दूरी है

कांधोपर कितनी जिम्मेदारी है
अपना सोचना भी मगरूरी है
दिल का हाल कैसे जताएँ
पर यह भी तो एक कायरी है

तेरे साथ जो बातें गुजरी है
उन से जुडी सारी यादें सुनहरी है
रही दिलों की दास्ताँ अधूरी
तब जा के तो बनती शायरी है

४-४-८५

# गुजरती उम्र

मेरी गुजरती उम्र मुझे
यूँ मिलकर जाती है
मानो जैसे हवा का झोंका
कली को हल्के बाहों मे लपेटे
उसे फूल बनाकर चला जाए
और कली को पता भी न चले
मैंने उम्र से कहा,
इस के आगे चलकर
मेरे खिलने का वक्त
तू मुझे बताती जा
वह मुस्कुराकर बोली
मेरे कहने से ज्यादा
तू खुद महसूस कर
जब चारों और से
भँवरे गुनगुनाने लगें
वही मेरा सबूत होगा
मैंने पूछा फिर आगे?
फिर जब खुशबू खत्म होगी
भँवरे दूर जाने लगेंगे और
सारा बदन कुम्हलाएगा
तब समझना के मैं हर साल
इसी दिन तुमसे मिलती हूँ
जिस तरह सागर की लहरे
किनारा छू कर लौट जाती है

७-५-८५

# शुक्रतारा


जब कोई मुसीबत आती है
तब सिर्फ तुम ही याद आओ
मैं किसी उलझन मे रहूँ तो-
दिल सिर्फ तुम्हे ही पुकारें
इस की मुझे वजह बताओ!

हर आपत्ती में जब मैं
ईश्वर के आगे झुक जाऊँ
उस में भी तुम नजर आओ,
निराश मन को आशा दिलाओ
इस की वजह बताओ!

क्या तुम सागर में खडे
अचल अटल दीपशीखा हो?
या, अंधेरे में जलते हुए
श्रद्धा के अखंड नंदादीप हो?

ऐसा लगता है, शायद
हर सफर में साथ देनेवाले
जो रात को दिखाई दे पर
दिन में भी साथ चले
ऐसे तुम शुक्रतारा हो!

७-५-८५



# आत्मपरीक्षण

मैंने मेरे आत्मा की बहुत जाँच की
उसे उल्टा-सीधा हर तरह से टटोला
लगा, कैसी आत्मा है मेरी, मैली मैली
पर यह बात भी इतनी सही नही
अरी पागल, तू क्यूँ उसे ढूँढती है?
वो जो तुझे समझे, जाने, पहचाने
वो जो शरीर नही आत्मा को परखे
क्यूँ तू सारे शंख खोजे जा रही है
जब एक मे भी स्वाती बूँद बरसी नहीं
तू कब तक अपने आँसू ढो कर
उनके मोती बनाने की कोशिश करेगी?
इतने बडे सागर में कैसी अनहोनी?
किसी के भीतर कोई पवित्र मोती नहीं
प्यार की जगह बस वासनाओंका कीचड
जिधर ढूँढो, जितना खोजो और जाँचो
सारे के सारे शंख खाली, खाली!

८-९-८५

# आहट

असीम सुख के समय पर भी
अनामिक दुख की मौजूदगी
रहती है मेरा दामन थामें
उस दर्द की हल्कीसी आहट,
अनदेखे बोझ का एहसास
मुझे हर वक्त महसूस होता है
यही वजह हैं के मेरी खुशीयाँ
मेरा साथ देने से डरती है
अपनों के बीच में अकेलापन
यह माजरा सुलझता नही
तनहाईयाँ अच्छी भी लगती है
और खालीपन डराता भी है
अब हालत-ए- जिन्दगी ऐसी है
जाम तो भरा है, मैं पी न सकूँ
जिन्दगी प्यार से बुलाए, पर
मैं जी न सकूँ, मर भी न सकूँ।

१०-१०- ८५

# मनाली में

बियास के किनारे पर बैठे थे हम
खयाल था तुम्हारा, दिल मे थी तुम


यूँ लगता था मुझे पास होती तू गर
बाँहों मे ले लेती तेरे प्यार का सागर

तुमसे मिलने पर यह अहसास हुआ
आज तक का सफर तुझबिन अधूरा हुआ

एक भी नजारा यहाँ जी को नही लुभाता
तेरी यादों का साया रहे बार बार रुलाता

काश मेरे आँसू इस नदी में बहकर
पहुँच जाँए तुम तक जमुना से मिलकर

२७-१०-८५




# साज़े सितार

ये कौन दीप लेकर आया है?
जो सारे अंधेरे दूर होने लगे
जब गमों का साया खोया तब
सुख ही सुख नजर आने लगे


ये कौन साज़े सितार लाया है?
जो सारे तार झनझनाने लगे
जब सुर में सुर खोने लगा तब
गीत ही गीत दिल से झरने लगे

ये कैसा बहारे़ मौसम छाया है?
जो पतझड पांव चुराने लगे
जब गुलशन ने खिलना सीखा तब
फूल ही फूल मुस्कुराने लगे

दीप, बहार ओ मौसम पाया है
जो जीवन में रंग ढलने लगे
चाहे कोई मुसीबत आ पडे अब
मन श्री रामकृष्ण कहने लगे



२७-२-८६, कन्याकुमारी



# माँ का आंचल

माँ का आंचल छोडकर
हे 'अरुणा'चल
तेरी गोद में आ गयी हूँ
जब तुम्हारे माथे से
'प्रकाश' की किरनें
सारे जहाँ में ओजस फैलाती है
तब मुझे उन की याद आती है
जिन के नाम से
मुझे दुनिया जानती है।

५-३-१९८७

# सराया

ऐ गमों मैंने आधी उमर संभाला तुम्हे
पर अब से तुम सब को मेरा अलविदा
यह सराया, जो बहुत पुराना था
जिस में एक चुपचाप कोयल रहती थी
उसे कब का दफना दिया मैने।
गहरे घावों और जखमों से,
जिस की दिवारें टूटने को आई थी
उसे मैंने अपने हाथों से गिराया
अब एक नया मकान बन रहा है
जिस में दुखों को कोई जगह नही
जो आशा का चराग लाए हो, तो
आपका बहुत हार्दिक स्वागत,
गर निराशाओंका दामन थामे हो, तो
आप को मेरा अंतिम अलविदा...

१७-२-८७

# मैली चादर

कहाँ थी मैं, कहाँ आ गयी हूँ
क्या थी मैं, क्या बन गयी हूँ?

मुडकर देखूँ तो सब अजनबी सा
लोग बदले या मैं बदल गयी हूँ?
क्या थी मैं, क्या बन गयी हूँ?

आगे देखूँ तो मंजिल नजर आती है
रुख यूँ बदला के खुद राह बनी हूँ
क्या थी मैं, क्या बन गयी हूँ?

आज गौर से निहारा अपने आप को
मैली थी चादर पाक बन गयी हूँ
क्या थी मैं, क्या बन गयी हूँ?

*१७-२-८७*
*विकेवि, ताफ्रागाव, अरुणाचल*

# ओ सागर


जब जब आकाश निहारती हूँ
तब तब तुम बहुत याद आते हो।


यह निलायंबर बाहें फैलाकर
अंत में तुम ही से जाके मिलता है
जब जब दिल यह सोचता है
तब तब तुम बेहद याद आते हो।

दूर तक दिखनेवाली लोहित, दिगारू
ब्रह्मपुत्रा को संग लिए तुम ही से मिलेंगी,
जब जब यह विचार उभरता है
तब तब तुम बेहद याद आते हो।

शाम को जब 'शिवोहम' कहती हूँ
नीले राम-कृष्ण जब स्मरती हूँ
कहीं भी नीले की लौ दिखी तो
सच मे, तुम बहुत याद आते हो।

७-३-८७
विकेवि, ताफ्रागाव, अरुणाचल





# भगवन्

तुम केसे हो और क्या हो?
तुम्हारा रूप मैं नही जानती
पर हर पल, हर घडी
हर बात में हर मौके पर
तुम्हारा अस्तित्व महसूस होता है
तुम दिखते नहीं फिर भी
तुम कहीं आसपास होते हो
मैं जानती हूँ तुम नजदीक हो
इतने निकट के मेरे हृदय में
सांस लेती हूँ तो यूँ लगता है
तुम देख रहो, सुन रहे हो
पहले जो अकेलापन था
सब मिट गया, अब तो
सारा अंध:कार दूर हुआ
हरदम तेरा संग रहना
जीने का हौसला बढाता है

# अनुभूती

जितकं जितकं अधिक वाचते
तितकीच मी अज्ञानी होते
ह्याचं कारण शोधू म्हणता
अधिकाधिक वाचू लागते

कुणी म्हणतं जग मिथ्या
जे दिसतं ते ते माया
ह्याचा अर्थ शोधू जाता
खोटी दिसू लागते काया

केवळ 'पुरुष' आहे ब्रह्म
अन् 'प्रकृती' मात्र भ्रम
ह्याचे गुह्य धुंडू लागता
मनास माझ्या पडे संभ्रम

म्हणे 'परब्रह्म' ह्याहुनी पर
निर्गुण, निश्चळ, निराकार
ह्याचे प्रत्यंतर पाहो जाता
मज दिसे तो सगुण, साकार

कैसी पहा ही पडली भुली
शोधू जाता अलभ्य झाली
जणू पुस्तके म्हणती मला
अगे, अनुभूतीविण सर्व धुली!

*२६-४-८८*
*विकेवि, ताफ्रागाव, अरुणाचल*

# तुळशीमाळ

नको मज तुळशीमाळ
झांजा, चिपळ्या नि टाळ
मन आक्रंदे दिन रात
जसे आईसाठी बाळ।


आला काळ, गेला काळ
माया विणते रे जाळं
घाल माझ्या नयनी आता
तुझ्या भक्तीचे काजळ।

म्हणे वारा खळखळ
पाहा नदी झुळझुळ
वाहे गिरीहुनी तीरी
तसा अहंकार गाळ।

मन धावे रानोमाळ
कशी धरू जपमाळ?
धाव धाव रे श्रीरंगा
मनासंगे जातो वेळ।

करी मनास नितळ
जीव करी तळमळ
तुझे नाव घेता मुखे
सरो अंतरीचा मळ।

*–२९–७–८८, गुरुपौर्णिमा,*
*अलाँग, अरुणाचल प्रदेश*



# गुमनाम

सागर की लहरों पे सवार
सामने खडी यादों की कतार
अनगिनत अनजाने रास्तों से
क्यूँ आती रहती है लगातार?

मैंने रेत पर लिखे थे नाम
कुछ पहचाने, कईं गुमनाम
लहरों ने मिटाने से पहले
आसूँओ में बहकर हुए बेनाम

डूबते सूरज के सुहाने रंग
क्षितिज की लकीर के संग
लहरों की गूंजन में खोई
मेरी यादें रही अपने में दंग

२८-१-९०

# स्मृती

स्वातीच्या थेंबासारखं
तुझं आगमन मी
मनीच्या सागरात,
हृदयाच्या शिंपल्यात,
हळुवारपणे जपलंय
तुझं असणं माझ्यापुरतं
तुझ्या स्पर्शांच्या स्मृती,
त्यांचे अगणित मोती,
खोल खोल निळाईत,
फक्त मी सजण्यासाठी
दडवून ठेवलेतं
आला जरी राजहंस दारी
नाही देणार मोती त्याला
होता दुष्यंताची विस्मृती
म्हणशील मला कुठली प्रीती?
तेव्हाच दाखवेन मौक्तिकमाला
कसं हृदयात जपलंय तुला!

*मे १९९०*

# हे ईश्वर

तू यहीं है, यहीं कहीं
दिल के आसपास
तेरे कदमों की आहट
दिल पे ही सुनती है
और मैं आँखे बंद किये
तुझे देख लेती हूँ
जब तू दस्तक देता है
तब धडकन में सुनती है
और आंखे खोले मैं
तुझे करीब पाती हूँ
जानती हूँ, तू यहीं है
यहीं कहीं, दिल के पास

# नया मोड

जिन्दगी ऐसा नया मोड लेती है
हर वक्त कहीं और ले जाती है।

रास्ता अन्जान, अन्जान मुसाफिर
जिन्दगी पिछला मोड भूला देती है।

नये मोड की सुहानी करवट
आते दुख की आहट मिटा देती है।

राहों की नेक बरबादियाँ देख
जिन्दगी फिर नया मोड लेती  है।

८-९-९०



# स्पर्श

सारेच स्पर्श स्पर्शित नसतात
डोळ्यांचे स्पर्श अस्पर्श असतात

स्पर्शांच्या किती वेगळ्या जाती
स्पर्श जुळवतात अनामिक नाती

स्पर्शांत गुंतलेलं शरीर मरतं
अस्पर्शित देहातलं मन तरतं

स्पर्श अनेक गुपितं सांगतात
बोलके स्पर्श निःशब्द असतात

*१७ सप्टेंबर १९९०*

# धैर्य

तू विचारलंस, काय देशील?
जीव तोडून काय करशील?

सांग, काय काय देऊ तुला?
कसं काही पटवून देऊ?
मनात खूप आहे अन् त्याहून
खूप करावसंदेखील वाटतं...
मी उत्तर देत नाही; पण
माझ्या डोळ्यांतून जाणून घे
मी मलाच द्यायला तयार आहे
तू स्पर्शानि समजून घे
देह नि मन तर कवडीमोल
मी आत्मा देऊ केला आहे
फक्त प्रश्न एवढाच की,
माझी प्रीत स्वीकारण्याचं
तुझ्यात धैर्य किती आहे?

२४-९-९०

# खोया चाँद

तेरे आने की बात है
चाँद खिलने की बात है
चाँद खिला तुम ना आए
शायद मेरे मौत की रात है

गम तेरी जुदाई का नहीं
चांदनी के खोने का नहीं
डर तेरे भूल जाने का है
सांस रुक जाने का नहीं

तेरा गुस्सा सर आँखो पर
तेरी रुसवाई सर आँखो पर
मेरा तडपना कदमों तले
तेरा तडपाना सर आँखो पर

२ -१०-९०

# मेहेरबानी

यूँ हैरान ना होना
सुनकर मेरी कहानी
न तो सवाल पूछना
कैसे कटी जिन्दगानी

बेशक यकीं करना
होगी बडी मेहेरबानी
न दिन थे सुनहरे
न कभी रातें सुहानी

कहाँ खोया बचपन
और गँवायी जवानी
कोई नहीं है अपना
सारी दुनिया हुई बेगानी

किसने हमसे क्या छीना
पूछे आँखो से बहता पानी
जो राज ना तूने जाना
वोही बात मैंने ना जानी

१०-११-९०



# कोयल

कोयल, तू चुप थी अच्छा था
चुप ही रह जा तो और अच्छा
अधूरा गीत तो तूने गाया
अधूरा सपना जो तूने देखा
वो कहानी जो रही अधूरी
तेरा घोंसला भी बना अधुरा
इन्हें पूरा करने की तमन्ना
दिलो दिमाग से निकाल दे
सपनों को घर के साथ मिटा
तेरी नन्ही को गीत ना सुना
राजा-रानी की कहानी तो,
लाडली को कभी ना कह
उसे तो कहीं और पलना है
पागल, क्यूँ कुहुकती है?
क्या तू जानती भी है?
शहजादा समुन्दर पार है
आसमान से भी वो दूर है
और तू पेड़ों में छिपकर
दर्दभरी बिरहन गाकर
उसे बुलाए जो सुने नहीं
काहे पुकारे बार बार
वो मीत जो तेरा नहीं...

१९.११.९०

# बकुळफुला

खरंच सांग येशील का तू अस्तित्वात?
की राहशील फक्त स्वप्नांच्या राज्यात?

इवल्याशा हातांनी घाल मिठी मला
घेऊन कवेत मग झुलवीन मी झुला

तुझ्या मिठीत मिळेल साखरेची गोडी
पाहा आली नाहीस तर होईन मी वेडी

तुजवीण सुकले गं बकुळफुला
किती तू हवीस? कसं सांगू तुला

नसेल थाटमाट अन् रुप्याचा वाळा
तुझ्या सुखासाठी या देहाचा हिंदोळा

२०-१२-९०

# मृत्यूस...

न सांगता, न सवरता
अचानक येऊ नकोस
तुझं इतरांना भेटणं अनाहूत
मी सतत पाहात असते
इतकी वर्ष तुझी वाट पाहिली
स्वतःहून तुला भेटणार होते
आताही ओढ तशीच आहे
पण आता तसं भेटायचं नाही!
मी आमंत्रण देणार नाही पण...
अचानक मात्र येऊ नकोस!
तुझं येणं मला अनुभवायचंय
तुझ्या अज्ञात बाहूंचा स्पर्श
मला सर्वांगानं जाणवायचाय

# सलोनी

एक प्यारीसी गुडिया है
पर जाने कहाँ खोयी है

देखूँ नितरैन सपने तेरे
भूलूँ निसदिन अपने मेरे

दूर दिखे चंदा की रोशनी
उस से दूर तू मेरी चांदनी

सुबह की कोख से आए किरन
मेरी कोख से कब लेगी जनम?

सलोनी सिर्फ तेरा इंतजार है
किसी से वादे का इकरार है

तू आए तो कहाँ रखूँ?
सारी दुनियाँ से तुझे छुपाऊँ

इतना बरसाऊँ प्यार तुझपर
बह जाएँगे आकाश-सागर

लाडली बस जल्दी से आजा
बाट तकत रानी और राजा

२०-१२-९०



# लहरी

सागर तुम हो लहरी
अपनीही लहरों की तरह
कभी बिगडते और रुठते
तो कभी बाहों में भरते
हमे डर लगे है बहुत
बदलते ज्वार-भाटों सें
कब खुद को लोगे समेट
कब किनारे दोगे पटक?
कौन जाने तेरा अंतर
क्या छिपा तेरे अंदर
अनदेखा तुफान खौलता
या फिर आँधी भयंकर?

८-५-९१

# O Darkness

May I ask YOU please?
O Darkness, do tell me
Why engulf my all,
Nook & corner of heart
Why envelop always,
Every crevice of my being
No lamp ever lights
Nor any light shines
And remove You or
Part of your presence-
Your powerful existence
Makes me aware
Of my deep loneliness
Which hugs me more,
Closer to its heart
Your kiss on my lips,
Warm breath on cheeks,
Make aloof and apart
Me from myself
Shadows of future-
Haunt my present
Gifts of sorrows do
Await me very soon
Yet I snuggle close
Put my arms around
And invite some more
Lonely darkness to
Cover my heart & soul
Night of nightmares
Dreams of darkness
Come without askance
Hold my hands and
Draw me near,
Nearer and nearer
Near to darkness

Sept 1991

# गल्लत

तुझ्यात गुंतत चालले आहे
तूच सांग  हे ठीक आहे का?
ठरलं होतं नुसती मैत्री ठेवायची
पण, मैत्रीचा स्पर्श वेगळाच असतो रे
तुझी भावना मैत्रीचीच आहे; पण
स्पर्श बदलत चालले आहेत
माझी मात्र विचित्र अवस्था
माझं मनंच स्पर्शात वाहून चाललंय
माझ्या मनाचा नि तुझ्या
नुसत्याच स्पर्शाचा सांग
कसा जमावा ताळमेळ
मला स्पर्शाचा तिटकारा
तर तुला स्पर्शाचीच ओढ
स्पर्शाची आणि संवेदनांची
ओढाताण करू नकोस
कदाचित माझं मन मरेल
किंवा तुझे स्पर्श सुकतील
म्हणून, तुला एक सांगू का?
मी गोजिरवाणं फूल नाही रे
अन् मी कमळ असले तरी
तू मात्र यःकश्चित भ्रमर व्हावंस
हे मला कदापिही मंजूर नाही



# धावा

कितती सोसावं सोसावं?
कसं सोसावं सोसावं?
परी सोसतना असं
कसं हसावं हसावं?

किती झिजावं झिजावं?
का झिजावं झिजावं?
झिजून मरताना असं
कसं जगावं जगावं?

खोटे चेहरे नि मृगजळं
कसा सांभाळावा जीव?
मन मरे क्षणोक्षणी
येते स्वतःचीच कीव

पडे कोसळून डोलारा
उडे तनावरचा ताबा
आवरून धरताना मन
करिते तुझाच रे धावा

# याद

नये गांव में, नये दांव में
नये देस में, नये भेस में
क्या मेरी याद आती है?

नये पर्वत और नई नदियाँ
नये नजारे और नई सदियाँ
क्या मेरी याद लाती है?

नये लोगों की नयी बस्ती
नये ऋतू की नयी कश्ती
क्या मेरी याद दिलाती है?

६–११–९३



# समुद्रपक्षी

हे फेनधवला सागरा
तू दिसलास किंवा
तुझा अंश दिसला
मला तर दोन्ही सारखं
अन् तितकंच प्रिय
वाटतं समुद्रपक्षी होऊन
तुझ्या बाहूंत शिरावं
मला पक्क माहीत आहे,
तुझ्या छातीवर डोकं टेकलं
की माझा एकलेपणा
जाणवणार नाही
तुझी अथांग निळाई
अखंड विश्वाचा एकलेपणा
अगदी सहजपणे
सामावून घेऊ शकते
हे जे भावनांचं, व्यथांचं
शरीराचं न् मनाचं
कंटाळवाणं ओझं आहे, ते
साद घालणाऱ्या निळाईत
समर्पित करून वाटतं
द्यावा सगळ्याला पूर्णविराम!







# साधना

खूप लिहावंस वाटतं
पण...
लिहिण्यासारखं काही घडतच नाही
काय लिहू?
कुठली भाजी केली?
कुठली बिघडली, कुठली छान झाली
की  फ्लॉवर चार रुपये पाव झाला
की पालकाची पानं किडकी निघाली
आज कणकेत खूप कचरा होता
चक्की बदललीच पाहिजे!
केंद्रात स्वयंपाक साधना होती
इथे पूजा आहे, असा आभास
खरोखर संसार रक्तातच हवा
सकाळ झाली की संध्याकाळ, की
पुन्हा सकाळ येतेच आहे.
दिवस-रात्रीच्या नियमित चक्रातून
सुटका केवळ अशक्यच आहे.
निर्बुद्धपणे टीव्ही पाहून पाहिलं
पण, आता मन रमत नाही.
खरंच, तशी मी सुखी आहे
खाणं, पिणं, कपडेलत्ते
वजनही वाढतच आहे
तरीही, ही कसली अतृप्ती;
जी कशानेही भरत नाही
ही कुठली अशांती;
जी कशानेही ढळत नाही
परब्रह्माचा शोध कुठे?
अन्नमयातच अडकले आहे
आनंदमय ते अन्नमय
प्रवास फारच रम्य आहे
अरुणाचल ते अमरावती
उद्दिष्ट अनभिज्ञ आहे

१५-१०-९५
अमरावती



# नातं

तुझं-माझं नातं
सांग कुठल्या गाठीचं?
कुठल्या जन्मीचं अन्
कुठल्या जन्मासाठीचं?

मागचंच तुटलेलं
या जन्मी जुळलं ?
की ह्या जन्मी उरलेलं
पुढल्या जन्मी पुरवायचं?

पण, खरं खरं सांग,
हे कळायलाच हवं का?
जे शब्दांना शक्य नाही ते
शब्दांत मांडायलाच हवं का?

शेवटी हेच खरं...
अधलं ना मधलं
इकडलं ना तिकडलं
तुझं-माझं नातं
शब्दांच्याही पलीकडलं!

८-११-९५

# जा निघून

डोळे भरून कडा ओघळताना
अश्रूंसवे दुःख पाझरताना
तू वाहून जा प्रत्येक थेंबातून
येऊ नको पुन्हा ढग गरजताना

होतास कुठे आकाश कवेत घेताना?
भरती सरून ओहोटी लागताना?
तू विझून जा जसे तारेही गेले मिटून
हो अनोळखी साऱ्या वाटा विसरताना

पाठव तुझे स्पर्श काळोख पांघरताना
जिवंतपणी मृत्यूचा श्वास ऐकताना
जा निघून, मी तशीच राहीन थबकून
ऊन वारा वादळ पाऊस सारे सारे सोसताना....

१८-०९-२०१२

# अस्तित्व

असतोस तू सतत सोबत
जाणता-अजाणता
श्वासातून होतो सतत
स्पर्श तुझा न जाणता
पण तुझी ओळख...
फक्त स्पर्शच का रे?

पाहते तुला अणूरेणूत
परागकणात आणि वेणूत
माझ्या हृदयाची,
होते धावपळ...
जेव्हा दिसतोस तूच माझ्यात


कमळांच्या देठात
आणि राघूच्या ओठात
नदीच्या काठी कधी,
थोडा सागर पोटात...
मिठीत घेऊ जाता मी
नाहीसा होतोस आड ढगात

कुठे शोधू स्पर्श तुझे
शोधून मग बांधू कशात ?
कुठे तुझे श्वास हरवले ?
अडकले का माझ्या श्वासात ?

श्वासांचेही स्पर्श संपले
उरले केवळ निष्पर्ण प्राणात
होते अपर्णा तर कधी सती
माझा शिव राहे माझ्या प्राणात...

देऊन गेलास रंग श्वेत
त्यात मिसळला केशर शांत
काळी रात्र संपून सख्या
आता रोज पांघरते नवे रंग
नवजीवनात माझ्या
मनात रमतो आहे एक संत...!!!

१६–१०–१०१३



# मृत्युसखा

हृदयाच्या खोल गाभ्यात,
फक्त मृत्यूचीच चाहूल
येताना सांग हं, नाहीतर
तुझीच पडेल मला भूल

तू येण्याची वेळ अवेळ
कळव थोडीशी आधी
लपून-छपून नको येऊस
होऊन आयुष्याचा पारधी

येण्याआधी थोडी सवड दे
झालेल्या चुकांची क्षमा मागू दे
अचानक मात्र येऊ नकोस तू
अंतरी तुझी ओढ जागू दे..

तुझी सोबत, तुझीच साथ
अखेरचीच अखेरपर्यंत..
केवळ तूच असा एकमेव
जो धरेल हात अंतापर्यंत..!!

५-१-२०१२

# अबोल दुःख

दुःखाना भाषा नसते,
दुःखाना शब्दही नसतात, पण..
या उरीचे त्या उरी जाण्यासाठी
निःशब्द दुःखं बोलकी होतात

जाणिवेच्या पल्याड अन्
नेणिवेच्या अलीकडे..
दुःख व्यक्त करण्यासाठी
शब्दही पडतात तोकडे

वेदनांचे व्रण दिसतात का?
त्या समजून घेतल्या पाहिजेत
पण आपल्यातच रमणाऱ्यांच्या
संवेदनाच लोपल्या आहेत...

शेवटी दुःखांना शब्द फुटतात
बोथट मनांना जागं करतात
कठीण कातळातून मग
अश्रूदेखील पाझरू लागतात.

२४-३-२०१२

# आत्मज्योत

तशी मी थकत नाही
थकून थकून भागत नाही
मागचे पाऊल पुढे सरेना
वाट काही संपत नाही..

मन असंच अडकून बसतं
पाय तिथेच रुतून राहतात
वाटेवरच्या गुलमोहरामध्ये
डोळ्यात प्राण थबकून राहतात

क्षितिजाच्या रेषेवरून
अंतरीच्या गाभ्यापर्यंत
वाट अगदी सरळ वाटते
गुंतलेल्या गाठींमध्ये
मध्येच वाट हरवून जाते

सोबतीची आस नव्हतीच कधी
तरीही वाट वाट पाहते
सांग सख्या नेशील कधी
आत्मज्योतीस तेजाकडे...

२४-५-२०१२

# तुझी सय येते

तू जाण्याने झालेली अखंड पोकळी
कोणी कधीच भरू शकत नाही...
सगळे म्हणतात, झाले मी मोकळी
एकही मोकळा क्षण तुला विसरू देत नाही

डोंगराएवढी जरी मी दु:खं साहिली
जगण्याचा आवेग का रोधत नाही?
पंचाग्नींनी शरीराची झाली काहिली
विरह वैरी रात्र ही, सरता सरत नाही

तुझा स्पर्श अन् तुझी ती मिठी पहिली
काही काहीच का रे आता स्मरत नाही?
तुझ्या सेवेत सारी बारा वर्षं वेचली
हरवले जे सारे, शोधू कुठे, गवसत नाही

कर्तव्याच्या पाशांची अदृश्य साखळी
किती करा यत्न, तोडू म्हणता तुटत नाही
सात पाउले जी काळ्या मण्यांनी बांधली...
सूरगाठ की  निरगाठ, सुटता सुटत नाही

असतोस मनातच पण आज तुझी सय आली
झाले 'कापूर' की 'वात तेवती' माहीत नाही
हरले-झुरले कितीही तरी प्रीत तुलाच वाहिली
ही श्रद्धा अचल अविचल काही केल्या ढळत नाही...!!!

५-६-२०१२

# उःशाप

एकदाच सख्या घे घट्ट मिठीत
दुःख सरून झिरपू दे सुख ह्या दिठीत
तुटोत सारे पाश अन् नात्यांचे दोर..
दे भरभरून पौर्णिमेचा चंद्र माझ्या ओटीत...


अपूर्णतेच्या शापातून कर मला मुक्त
अज्ञाताच्या जगताला होऊ दे व्यक्त
नको वचने अन् पुढील जन्मीची साक्ष
मिळेल का उःशाप की तुझीच राहीन फक्त!

राखेच्या ढिगाखाली जणू लोपल्या जाणीवा
अग्निमालेचा जीवा लागे वैशाखवणवा...
आषाढमेघ होऊन आता तरी चिंब भिजव,
स्पर्शाच्या हिंदोळ्यावर मागेन ज्ञानाचा जोगवा

होऊन भिक्षेकरीण राहीन द्वाराशी उभी
धरा जागी, चंद्र जागा, जाग्या तारका नभी,
वाढ त्यागाची शिदोरी अन् वैराग्याचा शिधा
शिवशंकर योगी, त्याची मी उमा वल्लभी...!!

२५-६-२०१२





# अरुणाचलास


तुझ्या कुशीत, तुझ्या मिठीत
वाटलं नव्हतं, येईन पुन्हा
तुला सोडून गेले मी दूर -
हा खरोखर माझाच गुन्हा...

नीलनिळे डोंगर, नितळनीर नद्या
होते जसे काल, असतील तसेच उद्या
नवे कोंब फुटताना तीच नीरव शांतता
हृदयात थेट फुलली तीच जुनी आर्तता

अनेक ओठांतून उमटती गीत तेथे
घुमतो एका सुरात जणू एकच गळा -
आसवांची फुले आणि स्मरणांचे धागे
सारं जग ढळलं जरी, तू अढळ अरुणाचला..

मी पुन्हा येईन न येईन,
बंधनांचे अदृश्य जोखड महा
तुझ्या स्वरात आहे ताकद,
सख्या, साद घालत रहा..

२५-६-२०१२



# O Ocean

Take me in your arms
Let me sleep till eternity
Restlessness unrests me
Unroot the deep pain within..
Unwound the hidden hurt
Only you have the heart
Large, infinite unconditional
Only you can encompass,
The unending agony that tears-
Tears the heart into shreds,
Unstopping tears tear me apart
Come hide me in your embrace
Let the watery eyes meet the salt,
May silence at the bottom cover me
May peace penetrate into the depth
Let none search let none find...
Till death do part me from you,
Let me rest undisturbed in you...!

05.09.2012

# अश्वत्थामा

अधेमधे उगीच वाटतं मला
की मी एकटी, मी एकाकी...
किती उणे, किती अधिक...
कधीकधी चुकतेच वजाबाकी

चार तपं जी साहिली दु:खं
आणखी किती उरली आहेत?
आयुष्याच्या पटावर अजून
किती अंक बाकी आहेत..?

सरल्या तमांच्या काळरात्री
मोजू म्हटलं तरी शक्य नाही
खोटंच हसून पाहिलं खूप; पण
अश्रूंची साथ काही सुटली नाही

एकलेपणाची जाणीव मिथ्या
अंतर्मनाचीच सोबत खरी...
कर्ममार्गाची आहे पथिक,
जरी एकटी, मीच आनंदयात्री

कशाकशानेही भरेनात हे
अनंत घाव नि ओल्या जखमा
प्रेमाचा लेप अन् श्रद्धेचं बळ..
मागत मीही झाले अश्वत्थामा....!

१९-०७-२०१२

# ऐ मेरे शब्दों

अपने आप से परे होकर यूँही
अचरज से निहारती रहती हूँ
शब्दों के मनोरम खेल की जैसे
मैं माला बंधती पिरोती देखती हूँ

कहाँ कहाँ से आते हो शब्दों तुम
मानो सीप मे जैसे मोती बंद हो
भावना सागर मे मन स्वाती बने
खुली पलकों तले मानो आंसू बंद हो

पता नहीं होता कौनसी भाषा में आओगे
किन लफ्जों को थामे तुम क्या रूप लोगे
लिखते लिखते आश्चर्य में डूबी जाती हूँ
कब रूह से उठकर शायरी बन जाओगे?

तुम ना हो तो बोलो मैं किस दर जाऊं
खाली घर में रहने कैसे अपने बुलाऊं
तुमही से है मंझिल और तुमसे ही वजूद
तुम में ही मैं शब्दों, तुम्हे कैसे भुलाऊं..?

२३-०७-२०१२



# मन पाखरू झाले

सोसले जे सारे त्याचे व्रण मिटून गेले
खोल खोल डोहात दुःखतरंग लोपून गेले
दिवस सरता वाटलं निःसंग झाले मी
पण, तळापासून उठले सारे शब्द गाडलेले

तुझ्यासाठी नव्हते कधी गीत मी लिहिले
नाही व्यक्त झाले, परी हृदयी राहून गेले
रडले-रुसले जरी कित्येकदा मी...
भाव मनीचे राहिले मनी, नाही ओठी आले

रात्र आली अंधारून नभही दाटून आले
काळे किर्र तम नयनी काजळून आले
दारं, खिडक्या, कवाडं बंद मनाआड मी
उडू नये जपले खूप; पण मन पाखरू झाले..!!

२१-१०-२०१२

# सखा

सखा कायम मनात असतो
भेटला न भेटला तरी
मनाला माहीत असतं
सखा सतत सोबत असतो

सख्याशी गळाभेट
व्हावी वाटते कधी
आम्ही दोन ध्रुवांवर,
भेटतो कधीमधी

सखा असतो कधी कृष्ण
कधी सखा होतो गुरू
सखा भेटेल मृत्यु रूपात
सख्यात होतं जगणं सुरू

सख्याचं रूप ठाऊक नाही
शोधलं खूप पंचक्रोशी
सखा सर्व सर्व ठायी
वृंदावन, बेलूर अन् काशी

*२३-११-२०१२*

# Magician



Getting entangled again
Is it right or wrong?
My room was lit up fully
But as you came it shone
Brightly as never before
You don`t even know
You will never ever know
What have you done!
No one before touched
Like a magic wand,
Without touching me
With your golden touch
The inner chords as now
No one dared to knock
None ever was allowed
To enter the solitary chamber
How did you come?
Without my knowing
Without my askance
I have nothing left
To give nor do I seek
Why have you come?
With a new happiness
Adding to my loneliness
What an irony of fate
You come, not to fill gap
Making me more empty
And yet I feel complete..!!!

25-11- 2012

# मेरी हवेली

कोसों दूर एक जगह है मेरी
भीड़भाड़ से बहोत दूर,
चाहे जितना ढूंढो सभी,
न सुन पाओगे
उस के गीतों का सुर


वहां मैं पल में चली जाती हूँ
सुनकर उसकी पुकार मधुर,
वहां की,
चहल-पहल को टहल के लौटूं,
अपने आप पे जैसे चढ़े गुरुर

गगन की बाहों से उतरूं जब
मुख दमके जैसे माथे सिन्दूर
सागर की गोद में जा छिपूँ,
अपने में मगन, अपने में चूर

ओस की तरह वह पाले मुझे
न होने दें कभी मगरूर
मेरी हवेली में झाँको ज़रा
रहने पे हो जाओगे मजबूर

१७-१२-१२

# अस्पर्शित स्पर्श



तुझे स्पर्श, माझे स्पर्श
स्पर्शांच्या रेशीमगाठी
एकेक गाठ उलगडताना
अलगद पडते कोमल मिठी

जपून ठेवलेत बंद कुपीत
स्पर्शांचे श्वास सुगंधी
प्रत्येक स्पर्श आठवताना
कढ दाटू दाटू येती कंठी

तुझे-माझे सहजीवन
अखंड वेदनांची लडी
तुझ्या वेदनेवर घातली
माझ्या देहाची पायघडी

आता परत येऊ नकोस
कुठल्या जन्मी भेटू नकोस
गतजन्मांचे फिटले ऋण
पुन्हा नात्यात बांधू नकोस

हो तूही मुक्त, मीही मुक्त
भोगू मुक्तीचा परीसस्पर्श
मृत्यू जीवीचा जिवलग सखा
उन्मुक्त त्याचा अस्पर्शित स्पर्श...!

३१ -१२- २०१२

# Tryst with Death

You were always very dear
And very close to heart
Most powerful most mighty
Yet no one loves you O death
But for me, you are a friend
Only you were always present,
In a very subtle form,
Felt but not seen by any
With everything temporary,
With all unreal except you
Life can deceive but not you
People cheat in Love & leave,
O Lord of Death, you don`t..
You won`t leave in the midst
I always felt your presence,
In the night and the days,
In the tears and the prayers,
In the shadow and the reals,
Holding my hand in yours,
Sleeping besides me unseen,
Always present & pretending not to be-
Years have passed & people have left,
Only you seem to exist . . .
Near me, with me, in me !

1-1-2013

# मृत्युसखा

हर साल इसी वख्त तुम याद आते हो
पहले उम्र मिलने आया करती थी
ऐ मौत अब तुम साया बनके चलते हो

क्यूँ ले जाते हो प्रियजनों को साथ?
क्यूँ मासूम कलियाँ चुरा लेते हो?
ऐ जीवन क्यूँ तुम अक्सर हार जाते हो?

तेरी वजह से उजडे कई घरबार
वह दर्द क्या तुम ने जाना या सुना?
क्यूँ अनहोनी को अनसुना करते हो?

क्या तुम अकेलेपन से कतराते हो?
बिना दस्तक, बिन बुलाये चले आते हो
और बिनाही पूछे अपने मे समेट लेते हो

अब सूनापन और ही सूना हो उठा है
भरी भीड़ में मन कोने जा बैठा है
मृत्युसखा, मैंने तुमसे दामन छुडाया है

३ -१-२०१३

# अन्जान अजनबी -

मेरा मन मेरे पास चुपचाप आकर बैठा है,
कहना चाहे पर उससे कहते नहीं बनता है।

मन मेरा चाहे जिसे, वह अन्जान ही रहता है,
फिर भी बाँध पूजा उसकी मन हौले से कहता है।

सहमे सहमे साए ने मानो मन को घेरा है,
कभी जाना पर अजनबी सा वह मीत मेरा है।

कौन है वह, है किस जगह, कैसा अजीब माजरा है,
कोई और नहीं, कहीं दूर नहीं, वह मेरा ही साया है।

१७-०१-१३

# "You Needn't Know"

Does it matter?
That you must know
That though being away
You are always near me
That without your presence
You still complete me
How does it matter?
That love is not expressed
That you don't understand
That your extreme goodness
The ever increasing respect
Makes you different,
Different from common men
New moon night cannot tell
She is always dark n subdued
It doesn't mean she can't say
She is shy and quite
Waiting for the Sun to come
Remove the darkness
Deep rooted in the being
Covering every niche
It matters with a ray
May it be Sun, Moon or Star
The light is needed
The light of love n hope
The light to know, just know
Being away yet close,
That you are there,
That you are always there…!

5-2-2013

# Unseen Mystic



You come silently, quietly
Without knocking at the doors
I hear your footsteps,
Knocking at my heart
Making me aware you have come
I open my eyes and search…
As the golden shaft opens
And the silver spills out,
As the dew deepens in roots
And the waves hug the shore
Amidst blue sky colours burst forth
Are you not there O Unseen?
As the music resounds in every pore
Through your flute soul floats to meet,
To meet You O Charmer..!
Whose magic spells through fingers
In my voice n verses You sing a song
Unsung melody resonate in shells n gong
In hurling rains and slashing pains,
Unheard music plays across the wind
From the bamboo groove,
From the shivers of the stream
As I look in and around
As I search out in the sound
O Mystic, O Mysterious one
You, who is one without a second,
Why do I search who do I look for?
When I find you are with me…
You always exist in me…!

2-03-2013

# जावळ

वाटतं सगळं सोडून द्यावं
घेऊन बसावं तुला जवळ
सगळी माणसं सगळं गावं
सगळं सगळं सोडून बाळा
फक्त हुंगावं तुझं जावळं

माझं प्रेम माझं ममत्व
हृदय म्हणतं चल उधळ
आपले परके सारा जमाव
सारून दूर सारे पाश पिल्ला
मिळो तुझे प्रेम अढळ

घ्यावं वाटतं तुला कुशीत
लावावं तीट आणि ओढावं काजळं
राहून गेलं जे सारं स्मृतीत
गाणी गावित गावी मी अंगाई
झरो प्रेमाचा पान्हा सजळ

सरली प्रतीक्षा संपली आसवं
भरली ओटी ओसंडली ओंजळ
अपूर्णतेची सर्व मिटली खंत
कळो न कळो तुला छकुले,
मनात जपेन मी हे नातं सोज्ज्वळ

१०-३-१३

# सौभाग्यवती

माझं काही नसताना माझं माझं म्हणत राहते
स्वतःच विणलेल्या जाळ्यांत पुन्हा पुन्हा फसत राहते

सगळ्या गोतावळ्यात मी दुरूनच पाहत असते
सगळे माझेच असतात तरी मी एकटी असते

किती जणींच दुःख असं अविरत मी भोगत रहाते
वांझोट्या जखमेची वेदना अनवट अंतरी स्रवत रहाते

ओटी भरणं हळदी-कुंकू सारखं दूर लोटत असते
काळे मणी मणीच असतात तरी नजर रुतत रहाते

कधी कुमारी, कधी सवाष्ण तर कधी मी आई असते
पण नुसतं तुझ्या नसण्याने मी 'सौभाग्यवती' नसते

२४-०३-१३



# जगदंबे

तूच मी आणि मीच तू
भेद नाही एवढाही
जेव्हा कळलं माझं मला
जगणं झालं अर्थपूर्णही

तुझ्यात मी अन् माझ्यात तू
एकरूप सारी सृष्टी ही
दुःख झाले जवाएवढे गे
सुख भरून ओसंडू वाही

तू आई, माझं स्वरूप तू
पूर्ण पवित्र झाले मीही
आपलं सुप्त अद्वैत अंबे
आता कोणीच परकं उरलं नाही

१०–११ –२०१२



## श्रद्धा पाटील-व्यास

शिक्षण - एम. ए. इतिहास

विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी येथे दहा वर्ष पूर्णवेळ कार्य. त्यातील चार वर्ष अरुणाचल प्रदेशात, तर सहा वर्ष पुण्यात कार्य.
अमरावती येथे 'दीपा एज्युकेशन सोसायटी' आणि नागपूरमधील 'सांदिपनी' शाळेत तीन वर्ष अध्यापन.
योगोपचार तज्ज्ञ म्हणून २५ वर्षांचा अनुभव. मुंबईत 'टीसीएस'च्या अनेक शाखांत दोन वर्ष योगोपचार व तणावमुक्ती वर्गांचे आयोजन.
सध्या 'शर्यान्स रिसोर्सेस लिमिटेड' कंपनीत गेल्या सहा वर्षांपासून 'सीएसआर' प्रमुख पदावर.
मुंबईतील 'भगवान महावीर विकलांग सहायता समिती'त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि 'इव्ह' या संस्थेत विश्वस्त पदावर कार्यरत.
स्वामी विवेकानंद यांच्या अभ्यासक मेरी लुई बर्क यांनी लिहिलेल्या 'न्यू डिस्कव्हरीज' या सहा खंडांवर सलग पाच वर्षे श्री सारदा मठात व्याख्यानमाला.
स्वामी विवेकानंद यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त वर्षभरात दीडशे व्याख्यानांचा संकल्प २४ डिसेंबर २०१२ रोजी पूर्ण केला.
लहानपणापासून काव्याची आवड. मात्र आतापर्यंत सर्व लेखन स्वांतसुखाय. आता पहिल्याच काव्य संग्रहाच्या निमित्ताने वेगळेच रुप जगासमोर येतेय.

गुरुसखा प्रकाशन